सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

फेब्रुवारी २०२५ । पृष्ठे : ५२

महाराष्ट्र

# आरोग्य पत्रिका

## दोन कोटी महिलांची आरोग्य तपासणी शुभारंभ
## विविध आरोग्य सेवा उपक्रमांचे लोकार्पण







# आरोग्य विभागाच्या विविध लोकोपयोगी आरोग्य सेवा उपक्रमांचे लोकार्पण
# २ कोटी महिलांची आरोग्य तपासणी शुभारंभ

















महाराष्ट्र
# आरोग्य पत्रिका
वर्ष : सत्ताविसावे | अंक : २ | महिना : फेब्रुवारी २०२५

मुख्य संपादक/प्रकाशक
**डॉ. कैलास बाविस्कर**
उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

सह संपादक
**डॉ. संजयकुमार जठार**
सहायक संचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.)

संपादन सहाय्य
**श्री. प्रशांत तुपकरी**
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

**श्री. सुनिल अलगुडे**
जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी

**श्री. महादेव गिरी**
प्रशासकीय अधिकारी, आरोग्य सेवा

**E-आवृत्ती**
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग
'परिवर्तन, आरोग्य भवन,
विश्रांतवाडी पोलिस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६

पत्रव्यवहारासाठी पत्ता

संपादक,
**राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग**
'परिवर्तन', आरोग्य भवन परिसर,
विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर,
येरवडा, पुणे ४११ ००६.
दूरध्वनी : ०२०-२६६१०१७८,
२६६१०१७९.
फॅक्स : ०२०-२६६१०१८०

e-mail :
ddhsiec.creatives@gmail.com



## दोन कोटी महिलांची आरोग्य तपासणी शुभारंभ विविध आरोग्य सेवा उपक्रमांचे लोकार्पण

## मोबाईल हेल्थ

/MahaArogyaIECBureau @Mahahealthiec @Mahahealthiec @Mahahealthiec

राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे द्वारा प्रकाशित

https://www.facebook.com/MahaArogyaIECBureau
https://twitter.com/MahaHealthIEC
https://www.instagram.com/mahahealthiec/
http://bit.ly/MahaArogyaYT
https://www.linkedin.com/company/maha-arogya-iec-bureau

संकेत स्थळ :
http.//maha-arogya.gov.in
http.//mahaarogyasamvadiec.in
maharogyasamvad

महाराष्ट्र आरोग्य पत्रिका

फेब्रुवारी - २०२५

# अंतरंग



१२ 'निरोगी महाराष्ट्रा'साठी माता-भगिनींचे आरोग्य जपणे महत्त्वाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे



१४ जनसहभागातून काम केल्यास महाराष्ट्र कर्करोग मुक्त होईल आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर



४७ 76 व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमामध्ये मा. आरोग्य मंत्री यांनी दिली क्षयमुक्त भारताची शपथ


• आयुक्तांचे मनोगत ........ ५
• संचालकांचे मनोगत (मुंबई) ........ ६
• संचालकांचे मनोगत (पुणे) ........ ७
• संपादकीय ........ ८
• लोकाभिमुख सार्वजनिक आरोग्य सेवेला प्राधान्य
मा. ना. श्री. प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग ........ ९
• राज्यात प्रथमच जाहीर होणार 'राज्य आरोग्य धोरण'- आरोग्य मंत्री यांची घोषणा ........ ११
• 'निरोगी महाराष्ट्रा'साठी माता-भगिनींचे आरोग्य जपणे महत्त्वाचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ........ १२
• जनसहभागातून काम केल्यास महाराष्ट्र कर्करोग मुक्त होईल-आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर ........ १४
• आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला विभागनिहाय सेवांचा आढावा ........ १६
• साथरोग कायद्यात सुधारणा करून आरोग्य विभागातील रिक्त पदे भरणार
आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर ........ १७
• ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमामध्ये मा. आरोग्य मंत्री यांनी दिली
क्षयमुक्त भारताची शपथ ........ १८
• सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी घेतला पुणे स्थित आरोग्य कार्यक्रमांचा आढावा ........ १९
• आरोग्य विभागाकडून राज्यभरात खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम ........ २०
• कुष्ठरोग - सामाजिक कलंक आणि भेदभाव ........ २२
• आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, वाशीम प्रस्तुत - मी आरोग्य विभाग बोलतोय...! ........ २४
• उसतोड मजुरांसाठी आरोग्य शिबिरे ........ २५
• कुष्ठरोग - एक सामान्य आजार ........ २८
• यशोगाथा :प्रेरणेचा प्रकाश -आशाताई यांच्या सेवाभावातून नवजीवनाचा उजाळा ........ २९
• मानसिक आरोग्य ........ ३०
• पाच वर्षात ग्रामीण भागातील ४४,४०,४०९ रुग्णांनी घेतला टेलिरेडीओलॉजी सेवेचा लाभ ........ ३२
• मानवी संवेदना आणि भावना संवाद रूपाने व्यक्त करून देणारी कार्यशाळा ........ ३३
• निर्मल संरक्षण ........ ३६
• कविता - निर्मल संरक्षण ........ ३८
• 'क्षयमुक्त भारता'साठी खासगी वैद्यकीय तज्ज्ञांचे
योगदान मोलाचे -आरोग्य मंत्री मा.ना. प्रकाश आबिटकर ........ ३९
• आशा संवाद ........ ४०
• कविता ........ ४५
• वृत्त विशेष ........ ४८
• लेखकांना विनंती ........ ५०
• राष्ट्रीय असंसर्गजन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत
निदान झालेल्या ६१,८१,४२८ रुग्णांवर उपचार ........ ५१

# आयुक्तांचे मनोगत



सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने माता आरोग्य हा विषय अत्यंत महत्त्वाचा असून, माता-भगिनींचे आरोग्य जर सुरक्षित असेल तर संपूर्ण घराचे आरोग्य चांगले व सुरक्षित राहते. त्यामुळे माता आरोग्याकडे अधिक लक्ष देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सुदृढ समाजाच्या दृष्टीने ती एक आवश्यक बाब आहे. त्यामुळे राज्य शासनाच्या वतीने माता-भगिनींच्या आरोग्यासाठी वेळोवेळी उपक्रम हाती घेण्यात येतात. आरोग्य विभागाने नुकताच दोन कोटी महिलांच्या आरोग्य तपासणीचा उपक्रम हाती घेतला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या उपक्रमाचा शुभारंभ झाला. या उपक्रमांतर्गत महिलांची रक्त तपासणी, हिमोग्लोबीन, मधुमेह, रक्तदाब, आवश्यकतेनुसार सर्व आरोग्य तपासण्या, निदान व उपचार करण्यात येणार आहेत.

आरोग्य विभागाच्या उपक्रमांना लोकसहभागातून सहकार्य मिळणे आवश्यक असते. माता मृत्यू दर, अर्भक मृत्यू दर व प्रजनन दर यांचे प्रमाण कमी करून प्रजनन व बाल आरोग्य चांगल्या दर्जाचे ठेवणे व लोकसंख्येचे स्थिरीकरण करणे याला महत्त्व देणे आवश्यक आहे. शासनाच्या वतीने यासाठी विविध योजना राबविण्यात येतात. या योजना प्रामुख्याने माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब कल्याण कार्यक्रम, आदिवासी भागासाठी विशेष माता आरोग्य कार्यक्रम, असे वेगवेगळे उपक्रम आखण्यात आलेले आहेत व त्याची अंमलबजावणी केली जात आहे. लोकांना द्यावयाच्या आरोग्य सेवेच्या गुणवत्तेत वाढ करणे, आरोग्य व्यवस्थापनाद्वारे सुसूत्रता आणून व प्रशिक्षण व योग्य मनुष्यबळाचा वापर करून आणि इतर शासकीय विभागांशी समन्वय ठेवून, तसेच सहभागी संस्थांची मदत, तज्ज्ञ डॉक्टर्स व खासगी व्यावसायिकांसोबत समन्वय ठेवून महिला व समाजाचे सबलीकरण करणे यासाठी प्रयत्नशील आहोत.

राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, आरोग्यवर्धिनी केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, महापालिके अंतर्गत असलेली रुग्णालये तसेच मानांकित केलेली खासगी रुग्णालये यांच्यामार्फत माता आरोग्याच्या सेवा दिल्या जातात. या सेवांचा योग्य वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. माता आरोग्यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना तयार करण्यात आलेल्या असून, त्या आरोग्य संस्थांच्या माध्यमातून पुरविण्यात येतात. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना, जननी सुरक्षा योजना, आदिवासी भागासाठी नवसंजीवनी योजना, प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, लक्ष्य उपक्रम, नियमित लसीकरण कार्यक्रम, कुटुंब कल्याण कार्यक्रम, किशोरवयीन आरोग्य, मानव विकास कार्यक्रम अशा विविधांगी योजनेतून माता आरोग्यसाठी विविध उपक्रम राबविले जातात. या सर्व योजनांना प्रतिसाद देऊन नागरिकांनी माता आरोग्याकडे जास्तीत जास्त लक्ष देणे आवश्यक आहे.

सध्या आरोग्य विभागाकडून राबविण्यात येणा-या दोन कोटी महिलांच्या आरोग्य तपासणी उपक्रमाला जास्तीत जास्त महिलांनी प्रतिसाद देऊन आपली व स्वतःच्या कुटुंबाची काळजी घ्यावी, असे आवाहन यानिमित्ताने करत आहे. धन्यवाद!

**श्री. अमगोथू श्री रंगा नायक**
आयुक्त, आरोग्य सेवा तथा
अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान,
महाराष्ट्र राज्य

# संचालकांचे मनोगत



आरोग्य सेवा पुरविण्यात महाराष्ट्र देशात सतत अग्रेसर राहिले आहे. राज्यातील जनतेचे आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी राज्य शासन अनेक कार्यक्रम केंद्र शासनच्या मदतीने हाती घेऊन ते लोकसहभागातून यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करते. सर्वांसाठी आरोग्य हे लक्ष्य गाठण्यासाठी व लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्य विषयक सोयी, उपक्रम सवलती त्याचबरोबर उपलब्ध असणा-या सेवा याविषयी समाजामध्ये जाणीव आणि जागृती निर्माण करून त्या सुविधांचा वापर करण्यासाठी आरोग्य विषयक जनजागृती हे महत्त्वाचे कार्य आहे. गेल्या महिन्यात आरोग्य विभागाने जागतिक कर्करोग दिनानिमित्त कर्करोग तपासणी आणि कर्करोग जागरुकता मोहीम हाती घेतली. या मोहिमेला नागरिकांचा वाढता प्रतिसाद आहे.

लोकांच्या आरोग्याचे संवर्धन आरोग्य शिक्षणाने आणि जागृतीने करून लोकांमध्ये चांगल्या सवयी रुजविण्यासाठी विविध माध्यमांतून लोकसहभाग वाढविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. यामुळे आरोग्य सेवेत चांगले बदल घडत असून आरोग्याचे आधुनिकीकरण होत आहे. सामान्य माणसापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. आरोग्याचे विविध घटक शारीरिक, मानसिक व सामाजिक दृष्टीने चांगले राहण्यासाठी तसेच आहार कुटुंब कल्याण, बालसंगोपन, स्त्रियांचे आरोग्य यावरही प्रामुख्याने भर देण्यात येत आहे. स्तनपान, लसीकरण, आहार, कुटुंब कल्याण, आरोग्य विषयक गैरसमजुती, आरोग्य विषयक शास्त्रीय दृष्टिकोन, आरोग्यदायी सवयी, शास्त्रीय दृष्टीचा अवलंब याविषयीही समाजामध्ये जागरुकता निर्माण होऊन त्याला सामान्यांचा चांगला प्रतिसाद मिळतो आहे.

आरोग्य विभागाच्या वतीने माता आरोग्य सुधारण्यासाठी माता आरोग्य, बाल आरोग्य, कुटुंब कल्याण कार्यक्रम, किशोरवयीन आरोग्य, पीसीपीएनडीटी कायद्याची अंमलबजावणी, आदिवासी विभागासाठी आर. सी. एच. कार्यक्रम राबविले जात आहेत. या अंतर्गत सेवेच्या गुणवत्तेत वाढ करणे, आरोग्य व्यवस्थापनामध्ये सुसूत्रता आणणे, मनुष्यबळाचा विकास करणे व विविध विभागांशी समन्वय ठेवून माता आरोग्याच्या सुविधा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. महिला व समाजाचे सबलीकरण यांच्यासाठी प्रयत्न करणे व मुला-मुलींचे आरोग्य चांगले राहणे यासाठीही राज्य शासनाच्या वतीने विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनांचा लाभ राज्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, स्त्री रुग्णालय, महापालिके अंतर्गत रुग्णालय व नामांकित केलेली खासगी रुग्णालय या माध्यमातून विविध योजना माता आरोग्यासाठी राबविल्या जात आहेत. सर्व योजनांचा लाभ लाभार्थींना करून देण्यासाठी आपण सर्वांनी सजग राहणे आवश्यक आहे

समाजमाध्यमांचा वापर करून दररोज वेगवेगळ्या विषयावरती प्रबोधन घडवून आणले जात आहे. त्यामुळे लोकांना आरोग्यविषयक माहिती मिळून त्यांचा आरोग्य मोहिमांमध्ये सहभागही वाढतो आहे. सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत देण्यात येणा-या आरोग्य सेवा जनसामान्यांपर्यंत पोहोचून त्याला चांगला प्रतिसाद मिळतो आहे व योजनाही चांगल्या प्रकारे राबविल्या जात आहेत. यात विविध स्तरावरील अधिकारी, कर्मचारी यांचा सहभाग व कर्तव्य यांचा वाटाही मोलाचा आहे. 'संकल्प निरोगी महाराष्ट्राचा' या दृष्टीने राज्याची वाटचाल सुरु असून जनताही त्यात सहकार्य करत आहे.

**डॉ. नितीन अंबाडेकर**
संचालक, मुंबई

# संचालकांचे मनोगत



वैज्ञानिक आणि वैधकीय क्षेत्रातील ज्ञानामुळे आपण खूप प्रगती केली आहे आणि त्यामुळे आपले जीवन काही प्रमाणात सुखावह परंतु गतिमान झाले आहे. या जलद गतीमान जीवनामध्ये अनेक समस्यादेखील निर्माण होतात. आपल्या अवतीभवती विविध समस्याही पाहत असतो, कित्येकदा त्यातील काही समस्या आपण स्वतः अनुभवतो. वैयक्तिक कौटुंबिक व सामाजिक समस्यांमुळे कधी कधी आपला ताण तणाव वाढत असतो हा मानसिक ताण तणाव वाजवीपेक्षा जास्त वाढू नये व भेडसावणारा असू नये यासाठीही आलेल्या समस्यांना यशस्वीरित्या तोंड देण्यासाठी मानसिक बळ वाढविले पाहिजे. मानसिक आरोग्याच्या दृष्टीने हे अतिशय महत्त्वाचे आहे.

आपल्या शारीरिक आरोग्याप्रमाणे मानसिक आरोग्यालाही निदानात्मक, उपचारात्मक, सुधारणात्मक बाजू आहेत. मानसिक आजार होऊ नये व मानसिक बळ कायम राहावे यासाठीही आपण काळजी घेतली पाहिजे. प्रत्येक व्यक्तीने स्वतःच्या सर्वांगीण प्रगतीसाठी मानसिक आरोग्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. आपले विचार, क्रिया, वागणूक याद्वारे आपण चांगले मानसिक आरोग्य ठेवू शकतो. इतरांबरोबरचे आपले सामाजिक जीवन व्यवहार देखील चांगले निभावू शकतो. आपल्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण ही प्रामुख्याने कुटुंबात होत असते. त्यामुळे आपले प्रत्येकाचे कुटुंब हे मानसिक आरोग्याचे जनक होय.

चांगल्या मानसिक आरोग्यासाठी कुटुंबातील व्यक्तींनी चांगल्या गोष्टीचे पालन करायलाच हवे. परस्परांना समजून घेऊन परस्परांवर विश्वास ठेवून परस्परातील नाते व संगोपन हे जबाबदारीने करणे आवश्यक आहे. जीवनात बालपण, तरुणपण आणि वार्धक्य या मानवाच्या जीवनातील तीन प्रमुख अवस्था आहेत. या तिन्ही अवस्थांमध्ये व्यक्तीचे मानसिक स्वास्थ्य हे स्वतःच्या प्रयत्नांवरही अवलंबून असते. त्यामुळे आपल्या स्वतःचे कुटुंबाचे व सामाजिक मानसिक आरोग्य चांगले ठेवण्यासाठी प्रत्येकाने आपापली जबाबदारी योग्य प्रकारे पार पाडणे आवश्यक झाले आहे.

आपल्या गरजांची पूर्तता करताना सर्वांना सोबत घेऊन परिस्थितीशी मात करण्यासाठी सर्वांनी प्रयत्नशील असणे आवश्यक झाले आहे. जीवन विषयक मूल्यांचा विकास करताना आपण व्यवस्थित काळजी घेऊन आपले मानसिक आरोग्य चांगले ठेवू शकतो. चांगल्या मानसिक स्वास्थ्यासाठी आणि उत्तम व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी आपण मानसिक आरोग्याकडे जास्त लक्ष देणे आवश्यक झालेले आहे. मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी व नवनवीन कौशल्य शिकवण्यासाठी राज्य शासनाच्या आरोग्य विभागातर्फे जनजागृती व शिक्षण विषयक उपक्रम राबविले जात आहेत. त्याला समाजाचा चांगला सहभाग मिळतो आहे, ही आनंदाची गोष्ट आहे.

धन्यवाद !

**डॉ. स्वप्नील लाळे**
संचालक, शहरी आरोग्य

# संपादकीय

सार्वजनिक आरोग्य सेवेत सामान्य माणूस हा केंद्रबिंदू असून प्राथमिक, द्विस्तरीय व त्रिस्तरीय सेवा प्रदान करताना सामान्य माणसाला अधिक दर्जेदार, निरोगी व आरोग्य संपन्न ठेवण्यासाठी शासनाच्या वतीने वेगवेगळे उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. केंद्र शासन व राज्य शासनाच्या अनेक आरोग्य योजना सामान्य माणसापर्यंत पोहोचविण्यासाठी व त्या सक्षम करण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. राज्याचे आरोग्य मंत्री त्या दृष्टीने अधिक प्रयत्नशील असल्याचे आपल्या निदर्शनास येते. राज्यातील सर्व सेवांचा आढावा घेत त्या अधिक सक्षम कशा करता येतील याकडे प्राधान्यांनी लक्ष देण्यात येत आहे. ही सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अत्यंत मोलाची अशी बाब म्हणावी लागेल. राज्य शासनाच्या वतीने देण्यात येणाऱ्या सेवा, त्यात येणाऱ्या अडचणी व समन्वय साधून त्या कशा दूर करता येतील याकडेही प्राधान्याने लक्ष देण्यात येत आहे. माता, बाल संगोपन, तारुण्यातील आरोग्य समस्या निवारण तसेच वृध्दापकाळातील कार्यक्रम सेवा, सुश्रुषा या बाबींकडेही प्राधान्याने लक्ष दिले जात आहे.

ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सक्षम कशा करता येतील व त्या ठिकाणी काम करणाऱ्या घटकांकडेही कसे लक्ष देता येईल याकडेही प्राधान्याने विचार केला जातो आहे. सार्वजनिक आरोग्य सेवेच्या दृष्टीने हे अत्यंत महत्त्वाचे असे पाऊल आहे. सार्वजनिक आरोग्य सेवा ही गाव पातळीपर्यंत पोचली असून आरोग्य सेवांचे जाळे राज्यभर पसरलेले आहे. आरोग्य मंदिर, प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण रुग्णालय, जिल्हा रुग्णालय यांच्या माध्यमातून सार्वजनिक आरोग्य सेवा सामान्य माणसापर्यंत पोहोचली आहे. या सेवांचा दर्जा अधिक सुधारावा, आरोग्य सेवेत अमुलाग्र बदल घडून यावेत तसेच सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक लोकाभिमुख व सर्वसामान्यांना सहज उपलब्ध होईल या दृष्टीने प्रयत्न केले जात आहेत, ही आनंदाची बाब आहे. सामान्य माणसांमध्ये आरोग्य माहितीचा प्रसार वाढत असल्यामुळे शासनाच्या सेवा सुविधा घेण्याकडे लोकांचाही कल वाढत असल्याचे आपल्याला दिसून येते. सार्वजनिक आरोग्य सेवेवरचा लोकांचा विश्वास अधिक दृढ होत असून या क्षेत्रातही काम करणारे डॉक्टर, परिचारिका, आशा यांचाही विश्वास व कामावरची श्रध्दा यातही बऱ्यापैकी चांगले बदल घडत असल्याचेही आपल्या निदर्शनास येते व हे निरोगी महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची अशी बाब म्हणावी लागेल.

राज्य शासनाच्या आरोग्यविषयक अनेक योजना सामान्य माणूस केंद्रबिंदू मानून तयार करण्यात आलेल्या आहेत. या योजनांचा लाभ करून देण्यासाठी व आवश्यकतेनुसार कधी, कशा व कुठे उपलब्ध होतात, याविषयी आपण समाजात प्रबोधन करणे अत्यंत आवश्यक आहे. ही सतत चालत राहणारी प्रक्रिया असल्यामुळे याकडे विशेष लक्ष देणे आपल्या सर्वांचेच कर्तव्य आहे. त्याला सुदृढ व आरोग्य संपन्न बनविण्यासाठी आपले प्रत्येकाचे योगदान अत्यंत महत्त्वाचे असून यासाठी आपण सर्वजण एकजुटीने प्रयत्न करू या व राज्याला आरोग्य संपन्न बनवू या!

**डॉ. कैलास बाविस्कर**
संपादक

# लोकाभिमुख सार्वजनिक आरोग्य सेवेला प्राधान्य

मा. ना. श्री. प्रकाश आबिटकर, मंत्री, सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण विभाग

"सर्वांसाठी आरोग्य" हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून सार्वजनिक आरोग्य सेवेत सुसंगती राखणे, मनुष्यबळाची क्षमता वाढवणे, वैद्यकीय, अवैद्यकीय पदे भरणे, प्रशिक्षित परिचर्या मनुष्यबळ उपलब्धता, सेवा सुधारणे, बृहत् आराखडा, आयपीएचएस मानके, औषधांची उपलब्धता, सेवा वाढविणे/अद्ययावत करणे, महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना विस्तारित करणे, शहरी आरोग्य व आपत्कालीन आरोग्य सेवेचा विकास करणे, वैद्यकीय पर्यटनाला चालना अशा विविध उद्देशाने लोकाभिमुख कार्यासाठी आरोग्य विभाग प्राधान्य देत आहे.

महाराष्ट्र हे क्षेत्रफळानुसार देशातील तिसरे मोठे राज्य असून राज्याची लोकसंख्या देशात दुसऱ्या क्रमांकाची आहे. राज्याचे साक्षरतेचे प्रमाण 82.91% असून देशात 12 व्या क्रमांकावर आहे. राज्याचा जन्मदर 15.6 व मृत्युदर 5.5 इतका आहे. राज्याचे सरासरी आयुर्मान 72.5 आहे. माता मृत्यू दर साध्य करणाऱ्या राज्यापैकी महाराष्ट्र राज्य हे दुसऱ्या क्रमांकावर आहे. 2017 चा राज्याच्या जनन दर 1.7 इतका आहे.

राज्यात आरोग्य सेवा प्रतिबंधात्मक व उपचारात्मक सेवा उपकेंद्रे, प्राथमिक आरोग्य केंद्र, उपविभागीय रुग्णालय, जिल्हा रुग्णालय, रुग्णालय व सामान्य रुग्णालयामार्फत पुरविण्यात येतात, विशेष संदर्भित सेवा जिल्हा रुग्णालय व उपजिल्हा रुग्णालयामार्फत देण्यात येतात, त्याच्या दर्जात वाढ करणे, सार्वजनिक आरोग्य सेवेत प्रतिबंधात्मक, निदानात्मक, उपचारात्मक व पुनर्वसनात्मक सेवा पुरविण्यात येतात. यात सुधारणा करणे व त्या सक्षम करणे यासाठी "संकल्प निरोगी महाराष्ट्राचा" या ध्येयाने राज्यातील आरोग्य सेवा अधिक सक्षम व गुणात्मकरित्या लोकाभिमुख करण्यासाठी वेगवेगळ्या योजना व उपक्रम हाती घेतले जात आहेत. तसेच विविध उपक्रमाद्वारे त्या अधिक सक्षम करण्याकडे व लोकांचा सहभाग वाढून त्या नियमितपणे लोकांकडून स्वीकार होण्यासाठी मोठ्या प्रमाणावर प्रयत्न करण्यात येत आहेत.



महाराष्ट्र राज्यातील आरोग्य सेवा ही देशातील महत्त्वाची व चांगली आरोग्य सेवा म्हणून देशपातळीवर ओळखली जावी व उपक्रमांना महाराष्ट्र राज्यातील आरोग्य सेवांना पथदर्शी उपक्रम म्हणून पाहिले जावे व त्याचा इतर राज्याकडूनही स्वीकार केला जावा, यासाठी दूरदृष्टी ठेऊन प्रयत्न केले जात आहेत. राज्य शासनाच्या वतीने माझ्या नेतृत्वात विविध योजना, उपक्रम व योजना हाती घेण्यात आले असून, सार्वजनिक आरोग्य सेवेला गुणात्मक व दर्जेदार आरोग्य सेवा विकसित करण्यात भर देण्यात आला आहे. लोकसहभागातून आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्याकडे शासन प्रयत्नशील असणार आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग लोकाभिमुख आणि लोककल्याणकारी व्हावा व जनतेचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढवा याला प्राधान्य देण्यात येत आहे.

राज्यात विविध आरोग्यदायी निर्णय, योजना, उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. यामुळे सार्वजनिक आरोग्य सेवेला दिशा मिळून समृद्ध व आरोग्य संपन्न महाराष्ट्र घडेल, असा विश्वास आहे. राज्यातील सामान्य माणूस केंद्रबिंदू ठेवून आरोग्य सेवा सर्वसमावेशक, लोकाभिमुख, लोककल्याणकारी व्हावी व देशात राज्याला अग्रेसर ठेवण्यासाठी पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

### सार्वजनिक आरोग्य विभागाचे महत्त्वाचे निर्णय

1. **राज्य आरोग्य धोरण व आरोग्य पर्यटन संकल्पना**
   सार्वजनिक आरोग्य विभागाची आरोग्य व्यवस्था अधिक बळकट व लोकाभिमुख करणारे महाराष्ट्राचे स्वतंत्र 'राज्य आरोग्य धोरण' व 'आरोग्य पर्यटन' ही संकल्पना रुजवण्याच्या दृष्टीने निर्णय.

2. **रिक्त पदांची त्वरित भरती** राज्यातील आरोग्य सेवा बळकट आणि सक्षम करण्यासाठी विभागातील रिक्त पदे व प्रतीक्षा यादीवरील पदे तत्काळ भरणार.
3. **वर्ग - 1 अधिकाऱ्यांची पदे तत्काळ भरणार** आरोग्य सेवेतील वर्ग-1 अधिकाऱ्यांची रिक्त पदे भरणार
4. **राज्यभरात खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम** राज्यातील खासगी रुग्णालयांकडून नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यासाठी विशेष मोहीम.
5. **संसर्गजन्य आजार कायद्याची अंमलबजावणी** संसर्गजन्य आणि साथीचे रोग नियंत्रणात राहावे यासाठी साथरोग कायद्याची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश.
6. **राज्यस्तरीय कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम** कर्करोगाविषयी व्यापक जनजागृती, तपासणी, निदान आणि उपचार करण्यासाठी राज्यस्तरीय कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहीम व तपासणीसाठी मोबाईल व्हॅनचे लोकार्पण.
7. **गर्भधारणापूर्व आणि प्रसवपूर्व गर्भलिंग निदान प्रतिबंधक कायद्याची कठोर अंमलबजावणी** स्त्री भ्रूण हत्या टाळून लिंग गुणोत्तराच्या प्रमाणातील दरी कमी करण्यासाठी 'पीसीपीएनडीटी' कायद्याची प्रभावी अंमलबजावणी.
8. **रुग्णालयांना अचानक भेटी** रुग्णालयांतील सोयी-सुविधा सुधारण्यासाठी महिन्यातून किमान दोन वेळा रुग्णालयांना भेटी.
9. **अत्यावश्यक व गरजेच्या औषधांचा नियमित पुरवठा** सर्व सरकारी रुग्णालयांमध्ये अत्यावश्यक व गरचेच्या दर्जेदार औषधांचा पुरवठा करणार.
10. **मानवी अवयव प्रत्यारोपण** मानवी अवयव प्रत्यारोपण कायद्यात सुधारणा करण्यासाठी पुढाकार.
11. **बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना सक्षम करणार** अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने मदत मिळावी यासाठी सरकारी रुग्णालयांमध्ये बाळासाहेब ठाकरे अपघात विमा योजना अधिक सक्षम करणार.
12. **रुग्णालय दत्तक योजना** वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत त्यांच्या प्रथम नियुक्तीची आरोग्य संस्था दत्तक घेण्याची योजना
13. **औषधे व उपकरणे मानक कार्यप्रणाली (एसओपी)**औषधे व उपकरणे मानक कार्यप्रणाली (एसओपी) धोरण सक्षम करणार
14. **ब्लड बँकेवर सनियंत्रणासाठी टास्क फोर्स** राज्यातील SBTC मार्फत खासगी व शासकीय ब्लड बँक यांच्यावर सनियंत्रण करण्यासाठी विशेष टास्क फोर्स
15. **50%बांधकाम पूर्ण झाल्यावर पद निर्मिती** रुग्णालयांचे बांधकाम 50 टक्के पूर्ण झाल्यानंतर पद निर्मिती करण्याच्या सूचना
16. **मानसिक रुग्णालय** निम्हांसच्या धर्तीवर मनोरुग्णालयात सेवा देणार
17. **बृहन्मुंबई महापालिकेसह सर्व महापालिकांच्या रुग्णालयांमध्ये** महात्मा फुले जन आरोग्य योजनेचा समावेश करणार
18. **राज्यातील सर्व नागरिकांचे आयुष्यमान भारत कार्ड काढून** पाच लाखापर्यंत मोफत उपचार करून देणार
19. **राज्यातील सर्व शासकीय रुग्णालयातील उत्कृष्ट सेवा बजावणारे** वैद्यकीय अधिकारी, अधिकारी, कर्मचारी तसेच जास्तीत जास्त नॉर्मल प्रसूती करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा मा. मुखमंत्री महोदय यांच्या हस्ते सत्कार करणार
20. **राज्यात 300 बेडची सुसज्ज कॅन्सर रुग्णालये उभारणार**
21. **राज्यातील पुणे, ठाणे, कोल्हापुर व जालना येथे** नवीन मनोरुग्णालयांची उभारणी करणार
22. **लॅब ॲक्टची स्थापना करून राज्यातील सर्व खासगी लॅबमधून** नागरिकांना योग्य चाचणी होण्यासाठी स्वतंत्र आस्थापना करून सर्व खासगी लॅबोरेटरी राज्य शासनाच्या नियंत्रणाखाली आणणार
23. **देशातील सर्वोत्कृष्ट सेवा देण्यासाठी 108 रुग्णवाहिकेची** दर्जेदार सेवा उपलब्ध करणार
24. **तत्काळ आवश्यक त्या ठिकाणी ब्लड उपलब्ध करून देण्यासाठी यंत्रणा उभारणार** खासगी व सरकारी ब्लड बँकेवटील नियंत्रण प्रभावी करण्यासाठी वेगळी यंत्रणा निर्माण करणार
24. **आर. सी. बी. अंतर्गत राज्यातील सर्व शाळांमधील** मुलांची तपासणी / निदान व गरजेनुसार मोफत उपचार
26. **दिव्यांग बांधवांना दिव्यांग प्रमाणपत्र 50 बेडपर्यंतच्या रुग्णालयात उपलब्ध होणार**
27. **महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत** समाविष्ट खासगी रुग्णालयासाठी मोबाईल ॲप व 24 तास हेल्पलाईन उपलब्ध करणार
28. **ग्रीन एनर्जी कार्यक्रमांतर्गत राज्यातील सरकारी रुग्णालयातील इलेक्ट्रिक बिल खर्च 1300 कोटी** वरुन जास्तीत जास्त कमी करणार

# राज्यात प्रथमच जाहीर होणार 'राज्य आरोग्य धोरण'

## आरोग्य मंत्री मा. ना. प्रकाश आबिटकर यांची घोषणा



सार्वजनिक आरोग्य विभागाचा चेहरा- मोहरा बदलणारे, राज्याची आरोग्य व्यवस्था अधिक बळकट व लोकाभिमुख करणारे महाराष्ट्राचे स्वतंत्र "आरोग्य विषयक धोरण" (state health policy) बनविण्याचे निर्देश राज्याचे आरोग्य मंत्री ना. प्रकाश आबिटकर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिले. भविष्यात महाराष्ट्रात 'आरोग्य पर्यटन' ही संकल्पना (Medical Tourisum) रुजवण्याच्या दृष्टीने काम करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

दिव्यांगाबाबत मा. मंत्री महोदय यांनी विशेष काळजी घेत दिव्यांग व्यक्तींना प्रवासात अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्यामुळे त्यांना जवळच्या ठिकाणी, सुलभतेने दिव्यांग प्रमाणपत्रे मिळावीत, यासाठी ग्रामीण रुग्णालय (50 खाटा) व उपजिल्हा रुग्णालय स्तरावर शिबीर आयोजित करून निकषानुसार तपासणी करून प्रमाणपत्रे वितरित करण्याबाबत सूचना दिल्या. दिव्यांगांना बोगस प्रमाणपत्रे देणारे व त्याद्वारे शासकीय योजनांचा लाभ घेणाऱ्या लोकांवर कडक कारवाई करण्याचे आदेश त्यांनी दिले आहेत. वैद्यकीय बिल प्रतीपूर्तीचे प्रस्ताव जिल्हा शल्यचिकित्सक यांच्याकडे प्रलंबित राहतात. त्यामुळे सर्व वैद्यकीय बिले दप्तरी दाखल झाल्यापासून 7 दिवसात मार्गी लावण्याचे निर्देश यावेळी मंत्री महोदय यांनी दिले.

दि. 04 फेब्रुवारी 2025 रोजी जागतिक कर्करोग दिन राज्य, जिल्हा स्तरावर व सर्व आरोग्य संस्थांमध्ये प्रभावीपणे राबविण्याच्या तसेच वाढते मधुमेहाचे रुग्ण पाहता आवश्यक तपासणी करून उपाययोजना करण्याच्या त्यांनी सूचना दिल्या. सदर दिवसांपासून महिला कर्करोग रुग्णांसाठी तपासणी शिबिरे राबवावी व त्यांना आवश्यक ते योग्य उपचार विनामूल्य उपलब्ध करून द्यावेत, अशा सूचना मा. आरोग्यमंत्र्यांनी दिल्या.

स्व. बाळासाहेब ठाकरे रस्ते अपघात विमा योजनेची माहिती सर्वांना व्हावी, यासाठी या योजनेची व्यापक प्रसिद्धी करावी, आरोग्य खाते अंतर्गत शासकीय अधिकारी यांच्या सुरू असलेल्या चौकशी प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा व योग्य असेल त्यांना न्याय द्यावा, अयोग्य असेल त्याला शास्ती करा, प्रकरणे प्रलंबित ठेवू नका, असे स्पष्ट निर्देश त्यांनी यावेळी दिले.

आरोग्य सेवेपासून कोणताही नागरिक वंचित राहणार नाही यासाठी आरोग्य संस्थामधील 'ब' वर्गातील डॉक्टरांच्या रिक्त जागा तातडीने भरणे आवश्यक आहे. त्याबाबत योग्य ती कार्यवाही करण्याची सूचना या बैठकीत देण्यात आली. बैठकीला सहसचिव, श्री. विजय लहाने, श्री. अशोक अत्राम, उपसचिव, श्री. शिवदास धुळे, श्री. दिपक केंद्रे यांच्यासह आरोग्य विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# 'निरोगी महाराष्ट्रा'साठी माता-भगिनींचे आरोग्य जपणे महत्त्वाचे

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे – राज्य शासन निरोगी महाराष्ट्र बनविण्यासाठी कटिबद्ध असून, रुग्णांना वेळेवर तातडीने उपचार मिळणे आवश्यक आहे. सामाजिक, कौटुंबिक आणि व्यावसायिक जबाबदारी सांभाळत असताना माता-भगिनी कायमच आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. त्यामुळे 'निरोगी महाराष्ट्र' बनविण्यासाठी सर्वप्रथम राज्यातील माता-भगिनींचे आरोग्य जपणे अतिशय महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज येथे केले.

उपमुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत लोकोपयोगी आरोग्य सेवा उपक्रमांचे लोकार्पण व राज्यातील दोन कोटी महिलांची आरोग्य तपासणीचा शुभारंभ आज उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते.

राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री. प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखाली या लोकार्पण सोहळा आणि महिला तपासणी शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन ठाणे येथील जिल्हाधिकारी कार्यालयात करण्यात आले होते. प्रतापराव जाधव, केंद्रीय राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) आयुष मंत्रालय व राज्य मंत्री, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, भारत सरकार, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे, अभिनेता गोविंदा, नविन सोना, आरोग्य सेवा तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक अमगोथू श्री रंगा नायक तसेच आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते. स्थानिक लोकप्रतिनिधीही या कार्यक्रमात सहभागी झाले होते.



दोन कोटी महिलांची आरोग्य तपासणी शुभारंभ
विविध आरोग्य सेवा उपक्रमांचे लोकार्पण

केंद्र सरकारच्या 'हर घर आयुर्वेद' या प्रकल्पाचा शुभारंभ प्रतापराव जाधव, केंद्रीय राज्य मंत्री (स्वतंत्र प्रभार) आयुष मंत्रालय व राज्य मंत्री, आरोग्य आणि कुटुंब कल्याण, भारत सरकार, यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला. त्याचप्रमाणे मानसिक आरोग्यासाठी मायका या मोबाईल ॲपचे उद्घाटनही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते यावेळी झाले. आरोग्य क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या डॉक्टर्स, दंतशल्यचिकित्सक, अधिपरिचारिका तसेच आरोग्य सेविकांचा यावेळी सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

राज्यातील प्रत्येक नागरिकांचे आरोग्य निरोगी असावे यासाठी राज्य शासन कटिबद्ध आहे, असे सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, " शासनामध्ये काम करणारे प्रत्येक अधिकाऱ्याने प्रमाणे नागरिकांनी सुद्धा संवेदनशील असणे महत्त्वाचे आहे. संकटाच्या काळात रुग्णांना वेळेवर तातडीने मदत मिळणे आवश्यक आहे. त्यामुळे आज लोकार्पण करण्यात आलेल्या आरोग्य सेवा उपक्रमांचा राज्यातील रुग्णांना खासकरून दुर्गम भागातील रुग्णांना निश्चित फायदा होईल. सामाजिक, कौटुंबिक, व्यावसायिक जबाबदारी सांभाळताना महिला स्वतःच्या आरोग्याकडे कायम दुर्लक्ष करतात. त्यामुळे महिलांची नियमित आरोग्य तपासणी होणे आवश्यक आहे. लवकर निदान आणि प्रतिबंधात्मक सेवा आणि उपाय सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. माता-भगिनींचे आरोग्य जपले तरच महाराष्ट्र निरोगी होईल.

"सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री श्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितले की, महिलांवर विविध जबाबदाऱ्या असल्यामुळे त्यांचे स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष

होते. आरोग्य कडे लक्ष देण्यासाठी त्यांना वेळ मिळत नाही. ही गोष्ट लक्षात घेऊनच आरोग्य विभागाने राज्यातील महिलांचे आरोग्य तपासणी करण्याचा उपक्रम हाती घेतला आहे. केंद्रीय राज्य मंत्री प्रतापराव जाधव यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गावाजवळील परिसरामध्ये वेलनेस सेंटर तसेच राष्ट्रीय हर्बल गार्डन प्रकल्प उभारणार असल्याचे यावेळी सांगितले.या लोकार्पण सोहळ्यामध्ये आरोग्य विभागामार्फत आरोग्य सेवा अधिक सक्षम, दर्जेदार आणि नागरिकांना सहजपणे उपलब्ध करून देण्यासाठी 8 कर्करोग मोबाईल व्हॅन, 7 ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट रुग्णवाहिका, 102 क्रमांकांच्या 384 रुग्णवाहिका, 2 सीटी स्कॅन मशीन, 80 डिजिटल हँड हेल्ड एक्स-रे मशीनचे लोकार्पण उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. त्याचप्रमाणे राज्यात 6 डे केअर किमोथेरपी सेंटर सुरू करण्याची घोषणा यावेळी करण्यात आली. राज्यातील दोन कोटी महिलांची आरोग्य तपासणी उपक्रमांतर्गत रक्त तपासणी - हिमोग्लोबिन सर्व प्रकारच्या तपासण्या, मधुमेह, रक्तदाब, गरजेनुसार ईसीजी तपासणी, सर्वसाधारण तपासणी, निदान व उपचार करण्यात येणार आहेत. कार्यक्रमाचे प्रास्ताविक आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियान संचालक अमगोधू श्री रंगा नायक यांनी केले.

## असा आहे सार्वजनिक आरोग्य विभागाचा उपक्रम

- राज्यातील 2 कोटी महिलांची आरोग्य तपासणी होणार असून यामध्ये रक्त तपासण्या, हिमोग्लोबीन, मधुमेह, रक्तदाब, आवश्यकतेनुसार सर्व तपासण्या निदान व उपचार करण्यात येणार आहेत.
- राज्यात 8 ठिकाणी अकोला, औरंगाबाद, लातूर, कोल्हापूर, ठाणे, नागपूर, नाशिक आणि पुणे येथे कॅन्सर व्हॅन लोकार्पण सोहळा होणार आहे. या वाहनांमध्ये कर्करोग प्रतिबंधात्मक (Preventive Onbolog) समुपदेशन, निदान व बायोप्सी या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. हे वाहन ज्या ठिकाणी जाणार आहे, त्या ठिकाणी कर्करोगासंबंधी व्यापक प्रमाणात जनजागृती करण्यात येणार आहे. उपसंचालक, आरोग्य सेवा परिमंडळ यांच्या स्तरावर कर्करोग वाहनाचा दौरा कार्यक्रम तयार करण्यात आलेला आहे.
- नव्याने खरेदी केलेल्या 7-अत्याधुनिक लाईप सपोर्ट रुग्णवाहिका सद्यस्थितीत आपत्कालीन वैद्यकीय सेवा प्रकल्पांतर्गत सुरु असलेल्या गडचिरोली-उपजिल्हा रुग्णालय, कुरखेडा, चंद्रपूर-उपजिल्हा रुग्णालय, वरोरा, सिंधुदुर्ग-उपजिल्हा रुग्णालय कणकवली, पुणे-उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर, रत्नागिरी-प्राथमिक आरोग्य केंद्र, मालगुंड, रायगड-ग्रामीण रुग्णालय महाड या ठिकाणी देण्यात येणार आहेत.
- सद्यस्थितीत अकोला, नाशिक, अमरावती, सातारा, पुणे गडचिरोली, सिंधुदुर्ग, रत्नागिरी व बीड या 9 जिल्ह्यांमध्ये कॅन्सर डे केअर सेंटर (किमोथेरपी युनिट) ची स्थापना झालेली आहे.
- राज्यात ठाणे सोलापूर, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड व वर्धा या 6 जिल्हा रुग्णालयांमध्ये कर्करोग उपचारासाठी किमोथेरपीची सुविधा नव्याने उपलब्ध करून देण्यात आली आहे. कॅन्सर डे केअर किमोथेरपी सेंटर अंतर्गत प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व अधिपरिचारिका यांच्यामार्फत कॅन्सर रुग्णांना उत्कृष्ट दर्जाची किमोथेरपी सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे.
- उपजिल्हा रुग्णालय वैजापूर, छत्रपती संभाजीनगर व उपजिल्हा रुग्णालय डहाणू, जि. पालघर येथील सार्वजनिक खासगी भागीदारीतून नव्याने कार्यान्वित करण्यात येणाऱ्या सीटी स्कॅन सुविधांचे लोकार्पण आज करण्यात आले.
- राष्ट्रीय क्षयरोग दुरीकरण कार्यक्रमांतर्गत शोधलेल्या संशयित क्षयरुग्णांच्या छातीचा एक्स-रे काढण्यासाठी 15व्या वित्त आयोगाच्या निधीमधून राज्यातील 34 ग्रामीण जिल्हे, 22 महानगरपालिका व मुंबईच्या 24 वॉर्डीसाठी राज्यस्तरावरून आलेल्या 80 डिजिटल पोर्टेबल हँड एक्स-रे मशीनचे लोकार्पण आज करण्यात आले.
- राज्यामध्ये 102 योजनेंतर्गत गरोदर माता व नवजात शिशुंना रुग्णालयात संदर्भित करण्यासाठी 384 नवीन रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# जनसहभागातून काम केल्यास महाराष्ट्र कर्करोग मुक्त होईल

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

## कर्करोग तपासणी व जनजागृती मोहिमेचे आरोग्य मंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

मुंबई – महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात आघाडीवर असून लोकसहभागातून आरोग्य विभागाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी श्रद्धेने काम केले तर महाराष्ट्र निश्चितच कर्करोग मुक्त होईल, असा विश्वास राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केला. जागतिक कर्करोग दिनानिमित्त राज्यस्तरीय कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहिमेचे उद्घाटन आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते आज (दि. 4 फेब्रुवारी) झाले. त्यावेळी ते बोलत होते.



आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या संकल्पनेतून आरोग्य विभागामार्फत आजपासून राज्यस्तरीय कर्करोग तपासणी आणि जनजागृती मोहीम राज्यभरात राबविण्यात येणार आहे. या मोहिमेदरम्यान कर्करोगाविषयी व्यापक जनजागृती, तपासणी, निदान आणि उपचार केले जाणार आहेत. मुंबईतील यशवंतराव चव्हाण सभागृहात एका कार्यक्रमाद्वारे या मोहिमेचे उद्घाटन आरोग्य मंत्री आबिटकर यांच्या हस्ते झाले. यावेळी आरोग विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक, सचिव - 2 श्री. विरेन्द्र सिंह, आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक श्री. अमगोथू श्री रंगा नायक, टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदिप गुप्ता, आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानाचे संचालक डॉ. स्वप्नील लाळे व्यासपीठावर उपस्थित होते.

आरोग्य मंत्री आबिटकर म्हणाले, "कर्करोगाची समस्या दिवसेंदिवस वाढत असून त्यावर नियंत्रण मिळविण्यासाठी लोकांचे प्रबोधन करणे गरजेचे आहे. पूर्वी शेतात श्रम करत असलेला माणूस शहरीकरणामुळे श्रम कमी करू लागला. त्याची श्रमाशी नाळ तुटली अन मानवाचे आरोग्य बिघडण्यास सुरवात झाली. अनेक आजार वाढत गेले. त्यात सर्वात भयंकर आजार म्हणजे कर्करोग आजार आहे. त्याचे प्रमाण वाढत चालले आहे. या कर्करोगावर आज मोठ्या प्रमाणात जनजागृती करावी लागणार आहे. आरोग्य विभागातील ग्रामीण भागातील शेवटचा घटक व मंत्रालयातील सर्वात वरिष्ठ अधिकारी हातात हात घाऊन या आजाराला हद्दपार करण्यासाठी पुढे आला पाहिजे. योग व इतर प्रबोधन कार्यक्रम राबवत संकल्प करत या आजाराला हद्दपार करावे लागणार आहे. व्यसनांमुळे कर्करोग होण्याचे प्रमाण अधिक असून लोकांना व्यसनांपासून परावृत्त करण्यासाठी आरोग्य विभागाने तसेच स्वयंसेवी संस्थांनी झोकून देऊन काम करण्याची गरज आहे. निर्व्यसनी माणसांना होणारा कर्करोग हा अधिक चिंतेचा विषय आहे. त्यामुळे आरोग्य विभागाच्या अधिकाई, डॉक्टर्स, कर्मचारी, आआरोग्य सेविका, आशा सेविका यांनी आजपासून श्रद्धेने आणि गतिमान काम केले तर आरोग्य क्षेत्रात आघाडीवर असलेला महाराष्ट्र 'कर्करोग मुक्त महाराष्ट्र' होईल."

आरोग विभागाचे सचिव श्री. विरेन्द्र सिंह आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, "कर्करोगाचे प्रमाण

आरोग्य विभागाचे सचिव श्री. विरेन्द्र सिंह आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, "कर्करोगाचे प्रमाण सध्या वाढत आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी सर्वांची भूमिका महत्त्वाची आहे. नागरिकांमध्ये जागृती, तपासणी, निदान, उपचार आणि त्यांचे पुनर्वसन अशा टप्प्यांमध्ये उपाययोजना करून कर्करोगाशी आपल्याला लढावे लागेल. शाळेपासून ते समाजापर्यंत व्यापक जनजागृती करावी लागेल. हे एका दिवसाचे काम नसून हा रोजचा लढा आहे. त्यामुळे सगळ्यांचे योगदान मोलाचे आहे."

टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता यांनी राज्यातील तसेच देशातील कर्करोगाच्या परिस्थितीविषयी माहिती दिली. त्यांनी सांगितले की, दरवर्षी भारतात 15 लाख कर्करोग रुग्ण आढळतात आणि त्यापैकी सुमारे 8 लाख लोकांचा मृत्यू होतो. येत्या काही वर्षात हे प्रमाण 21 लाखापर्यंत जाण्याची शक्यता आहे. त्यामुळे आपल्याला कर्करोगाशी लढायला तयार राहावे लागेल. कर्करोगावर योग्य वेळी योग्य उपचार होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सरकारने जागतिक कर्करोग दिनानिमित्त जी मोहीम सुरू केली आहे ती कौतुकास्पद आहे. देशातही याचे अनुकरण होण्याची गरज आहे.

या कार्यक्रमामध्ये रायगड कर्करोग आरोग्य सेवा माहिती पुस्तिका, तसेच मुख कर्करोग आणि मुख कर्करोग सदृश आजारांचे बाबत माहिती पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्याचप्रमाणे कर्करोग जनजागृती, तपासणी, निदान व उपचार सेवांमध्ये उत्कृष्ट कार्य करण्याऱ्या आरोग्य सेविका आणि आशा (ठाणे, रायगड), कर्करोग तज्ज्ञ, कर्करोग योद्धे, टाटा मेमोरिअल सेंटर या संस्थेचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

आरोग्य सेवा आयुक्त तथा राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे संचालक श्री. अमगोथू श्री रंगा नायक यांनी प्रास्ताविक करताना कर्करोग आरोग्य सेवा मोहिमेविषयी माहिती दिली. त्यांनी सांगितले की, या मोहिमेंतर्गत राज्यातील 30 वर्षावरील नागरिकांची तपासणी, निदान आणि उपचार केले जाणार आहेत. आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर यांनी मान्यवरांचे आणि उपस्थितांचे आभार मानले.



# आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी घेतला विभागनिहाय सेवांचा आढावा

मुंबई - राज्यातील आठ मंडळातील पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सेवांचा आढावा आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आज मुंबई येथे विभागीय उपसंचालकांच्या बैठकीत घेतला व दर्जेदार आरोग्य सेवा देण्यावर भर द्यावा, असे निर्देश दिले

आरोग्य संस्थांना सचिव, आयुक्त, संचालक, सहसंचालक, उपसंचालक, जिल्हा शल्यचिकित्सक तसेच जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी महिन्यातून किमान दोन वेळा अचानक भेटी द्याव्यात, अशा सूचना त्यांनी दिल्या. या भेटी दरम्यान रुग्णालयातील स्वछता, सुरक्षा, परिसर स्वच्छता, रुग्णकेंद्री सेवा, रुग्णाच्या आहाराचा दर्जा, रुग्णालयात मिळणारी वागणूक, औषधांची उपलब्धता, बाह्य संस्थेद्वारे नेमलेल्या कर्मचाऱ्यांना मिळणारे मानधन या बाबींची काटेकोर तपासणी करण्याचे तसेच काही अनियमितता आढळल्यास संबंधितावर तातडीने कारवाई करावी. या सर्व तपासण्यांचा राज्य स्तरावर अहवाल तयार करण्यात यावा व त्रुटी आढळून येणाऱ्या संस्थेच्या प्रमुखावर कार्यवाही करण्यात यावी असे निर्देशही त्यांनी दिले. मी स्वतः सुद्धा आरोग्य संस्थांना अचानक भेटी देणार असल्याचे आश्वासन आरोग्य मंत्र्यांनी विभागीय आढावा बैठकीत दिले. खासगी रुग्णालयाच्या तुलनेत सरकारी आरोग्य यंत्रणा सुधारण्यासाठी आमूलाग्र बदल करण्याची गरज असून, सार्वजनिक हितासाठी सरकारी रुग्णालयाची एकूण यंत्रणा सुधारण्यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचे आवाहन त्यांनी केले. गर्भलिंग निदान कायद्याची कडक अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. या कामी खबर देणाऱ्याला एक लाखाचे बक्षीस देण्यात येत आहे. त्याचप्रमाणे पथकात सहभागी होणाऱ्यांना सुद्धा चांगले मानधन देण्यात यावे. यासंदर्भात लोकांमध्ये जागृती करावी, तसेच संबंधित समित्यांना सक्रिय करावे, सामाजिक जाणीव असलेल्या लोकांचा, सेवाभावी संस्थांचा या कामी सहभाग घ्यावा, असे निर्देशही आरोग्य मंत्र्यांनी यावेळी दिले.

शासनाच्या प्रत्येक दवाखान्यात दर्जेदार सेवा मिळाव्यात यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने आपल्या पहिल्या नियुक्तीच्या वेळचा दवाखाना दत्तक घेऊन सामाजिक जबाबदारीने कामात सहभागी व्हावे, असे आवाहनही आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. आरोग्य संस्थांवरील लोकांचा विश्वास वाढावा यासाठी दर्जेदार सेवा देऊन रुग्णांशी चांगला संवाद ठेवावा, अशा सूचनाही मा. मंत्री महोदयांनी केल्या. या आढावा बैठकीला आरोग्य सेवा आयुक्त अमगोथू श्री रंगा नायक, संचालक नितीन अंबाडेकर, सहसंचालक व विभागीय उपसंचालक उपस्थित होते.



# साथरोग कायद्यात सुधारणा करून आरोग्य विभागातील रिक्त पदे भरणार

## आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर

साथीचे रोग नियंत्रणात राहावे यासाठी साथरोग कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी. तसेच साथरोग कायद्यात सुधारणा करण्याच्या सूचना देत रिक्त पदांचा व प्रतीक्षा यादीवरील जागा तत्काळ भरण्याच्या सूचना सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात झालेल्या बैठकीत दिल्या.

यावेळी आरोग्य मंत्री म्हणाले, वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या 20 मधील प्रतिक्षा यादीतील 400 जागा 15 दिवसांच्या आत भरल्या जाणार आहेत. तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या रिक्त पदांचा तात्काळ आढावा घेऊन (साधारण 2000 पदे ) पदभरती प्रक्रिया राबविण्याच्या सूचनाही आरोग्य मंत्र्यांनी दिल्या. जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी, तज्ञ वैद्यकिय अधिकारी 23 पदे एमपीएससी कक्षेबाहेर काढून सर्व पदे विभागीय पदोन्नतीद्वारे भरण्याची तात्काळ कार्यवाही करावी अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

माणसाच्या जीवनात सर्वात महत्वाचा असणारा आरोग्याचा प्रश्न गंभीर होऊ नये व त्यासाठी काय काय उपाययोजना केल्या पाहिजेत याबाबत त्यांनी उपाययोजना करण्यास सांगितले. नगरविकास व ग्रामविकास विभागाने पाणी , अन्न, स्वच्छता या बाबीवर विशेष लक्ष द्यावे. आरोग्य विभागाने यासाठी या दोन्ही विभागावर लक्ष केंद्रित करावे, असे निर्देश आरोग्य मंत्र्यांनी यावेळी दिले.

साथीचे आजार नियंत्रण करण्यासाठी कठोर पावले उचलावी. आजार होऊ नये यासाठी पूर्व खबरदारी घेण्यासाठी काय उपाय योजना करता येतील यासाठी संबंधित विभागाने गांभीर्याने काम करावे. गेल्या काही वर्षात आपण असे चित्र पाहिले आहे की अन्न पाणी व स्वच्छता या बाबीवर गांभीर्याने लक्ष दिले नसल्याने अनेक आजारांनी जनता त्रस्त झाली. कोविड च्या काळातही आपण अन्न पाणी स्वच्छता हवा यासारख्या बाबीवर गांभीर्याने लक्ष दिले नाही त्यामुळे ही साथ पसरत गेली.

अशुद्ध पाणी पुरवठा होत असल्याने अनेक आजार होतात.GBS सारखा आजार हा अशुद्ध पाण्यामुळे होत आहे. डेंग्यू, झिका,मलेरिया इतर आजार दूषित पाण्यामुळे होत आहेत त्यामुळे या सर्व बाबीवर गांभीर्याने लक्ष द्यावे असे निर्देश आरोग्य मंत्र्यांनी यावेळी दिले. साथरोग नियंत्रणात राहावे यासाठी साथरोग कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी. तसेच साथरोग कायद्यात सुधारणा करण्याच्या सूचनाही आरोग्य मंत्र्यांनी दिल्या. या बैठकीला आरोग्य राज्यमंत्री श्रीमती मेघना साकोरे-बोर्डीकर यांचेसह आरोग्य विभागातील प्रमुख अधिकारी उपस्थित होते.





# 76 व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमामध्ये मा. आरोग्य मंत्री यांनी दिली क्षयमुक्त भारताची शपथ

भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी 2025 अखेर पर्यंत भारत क्षयमुक्त करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. हाच नारा घेऊन क्षयमुक्त गाव, जिल्हा, राज्य, करण्याच्या दृष्टीने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री, कोल्हापूर श्री. प्रकाश आबिटकर यांनी पुढाकार घेतला आहे. या अंतर्गत कोल्हापूर येथे 26 जानेवारी रोजी शासकीय प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य कार्यक्रमांमध्ये क्षयरोग जनजागृती विषयक विविध उपक्रम पार पडले.

प्रथम 100 दिवसीय क्षयरोग मोहीमेचे औचित्य साधून स्वतः आरोग्य मंत्री यांनी सर्व उपस्थितांना क्षयमुक्त भारताची शपथ दिली. या कृतीतून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्राला क्षयमुक्त महाराष्ट्राचा पाया घालून दिला आहे व क्षयमुक्त महाराष्ट्र करण्यासाठी सर्व शासकीय यंत्रणेला प्रोत्साहित केले आहे. या कार्यक्रमावेळी आरोग्य मंत्री यांनी 100 दिवसीय क्षयरोग मोहिमेनिमित्त शासकीय प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांमधील मुख्य भाषणावेळी क्षयमुक्त ग्रामपंचायत व 100 दिवसीय क्षयरोग मोहीम याबाबत माहिती दिली तसेच कोल्हापूर मधील क्षयमुक्त गावांची माहिती दिली. जास्तीत जास्त क्षयमुक्त ग्रामपंचायती व्हाव्यात यासाठी प्रेरणा दिली व कोल्हापूर क्षयमुक्त करण्यासाठी सर्वांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.

100 दिवसीय क्षयरोग मोहीमेअंतर्गत शासकीय प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांमधील संचलनामध्ये निक्षय वाहन-चित्ररथाने सहभाग घेतला व संचलनामध्ये सलामी दिली. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री, कोल्हापूर श्री. प्रकाश आबिटकर व जिल्हाधिकारी, कोल्हापूर श्री. अमोल येडगे, विशेष पोलीस महानिरीक्षक (कोल्हापूर परिक्षेत्र) श्री. सुनिल फुलारी, महापालिका आयुक्त डॉ. के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कोल्हापूर श्री. कार्तिकेयन एस., पोलीस अधीक्षक श्री. महेंद्र पंडित, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुप्रिया देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अनिरुद्ध पिंपळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडलेल्या या कार्यक्रमावेळी निक्षय वाहन चित्ररथाबाबत संपूर्ण माहिती देण्यात आली. कार्यक्रम स्थळी 100 दिवसीय क्षयरोग मोहीम व क्षयमुक्त ग्रामपंचायत अभियानाचे जनजागरण बोर्ड लावण्यात आले.



# सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिवांनी घेतला पुणे स्थित आरोग्य कार्यक्रमांचा आढावा

पुणे स्थित आरोग्य कार्यक्रम कार्यालयांतील कामकाजाचा आढावा घेण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक आणि सचिव-2 श्री. विरेन्द्र सिंह हे दोन दिवसीय (दि. 30 आणि 31 जानेवारी) पुणे दौऱ्यावर आले होते. या दौऱ्यादरम्यान त्यांनी राष्ट्रीय विषाणु विज्ञान संस्था (एनआयव्ही), उपसंचालक, वाहतूक कार्यालय, बी. जे. मेडिकल कॉलेज, दीनानाथ मंगेशकर रुग्णालय, औंध जिल्हा रुग्णालय, सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा, राज्य आरोग्य शिक्षण आणि संपर्क विभाग, एचआयएनव्हीएस, माता व बाल आरोग्य, राज्य आरोग्य प्रणाली संसाधन केंद्र, वेक्टर बोर्न डिसीज, एकात्मिक रोग देखरेख कार्यक्रम, क्षयरोग आणि कुष्ठरोग या कार्यक्रम प्रमुख अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेतली.

डॉ. नितीन अंबाडेकर, संचालक, आरोग्य सेवा, मुंबई, डॉ. स्वप्नील लाळे, संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, शिवदास धुळे, उपसचिव, अण्णासाहेब चव्हाण, मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, महेश हनशेट्टी, कक्ष अधिकारी, नारायण डोळस, सहायक कक्ष अधिकारी, सोनल गावंडे, विशेष कार्य अधिकारी आदी अधिकारी या बैठकीला उपस्थित होते. सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सचिव डॉ. निपुण विनायक आणि श्री. विरेन्द्र सिंह यांनी प्रत्येक आरोग्य कार्यक्रमाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची स्वतंत्र बैठक घेऊन कार्यक्रमाच्या कामकाजाविषयी माहिती जाणून घेतली आणि त्यानंतर आरोग्य सेवेचे बळकटीकरण करण्यासाठी तसेच कामगिरी सुधारण्यासाठी अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना दिल्या.







# आरोग्य विभागाकडून राज्यभरात खासगी रुग्णालयांची तपासणी मोहीम

## 19 हजार पेक्षा जास्त खासगी रुग्णालयांची आरोग्य विभागाकडून तपासणी

मुंबई - राज्याचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या निर्देशानुसार राज्यातील खासगी रुग्णालयांकडून नियमांचे पालन होते की नाही, याची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने जिल्हास्तरावर तपासणी पथके तयार करून तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत 5 फेब्रुवारी पर्यंत राज्यातील 19,388 रुग्णालयांची तपासणी करण्यात आली असून 2,936 रुग्णालयांना तपासणीच्या अनुषंगाने कार्यवाही संदर्भात नोटीस बजावल्या आहेत.

आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी आढावा बैठकीत खासगी रुग्णालये नियमांचे पालन करीत आहेत की नाही हे तपासण्यासाठी राज्यातील खासगी रुग्णालयांची एक महिन्यात तपासणी करून कारवाई करण्याची सूचना आरोग्य मंत्र्यांनी केली होती. त्यानंतर आरोग्य विभागाने ही तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेची जबाबदारी प्रत्येक जिल्हा रुग्णालयातील जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा परिषदांमधील जिल्हा आरोग्य अधिकारी, महापालिकांचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्यावर सोपविण्यात आली आहे.



राज्यात खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यासाठी आरोग्य विभागाने विशेष मोहीम हाती घेतली आहे. यासाठी राज्यभरात जिल्हा स्तरावर पथकांची नियुक्ती करण्याचे आदेश आरोग्य विभागाने दिले आहेत. तपासणी करून आरोग्य सेवा आयुक्तांकडे दैनंदिन अहवाल सादर करण्यात येत असून, त्यानंतर रुग्णालयांवर कार्यवाहीसाठी नोटीस बजावण्यात येत आहेत.

सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत आठ मंडळांमध्ये खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यात येत आहे. त्यानुसार 31 जानेवारी पर्यंत, मुंबई मंडळाअंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांत आणि महानगरपालिका क्षेत्रामध्ये 4,405 रुग्णालयांची तपासणी करून 188 रुग्णालयांना नोटीस पाठविण्यात आली आहे. पुणे मंडळाअंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांत आणि महापालिका क्षेत्रामध्ये एकूण 3,743 रुग्णालयांची तपासणी करून 828 रुग्णालयांना नोटीस पाठविण्यात आलेल्या आहेत. नाशिक मंडळा अंतर्गत एकूण 3,343 रुग्णालयांची तपासणी करून 309 रुग्णालयांना नोटीस बजावण्यात आली आहे. छत्रपती संभाजी मंडळ अंतर्गत येणाऱ्या एकूण 1,375 रुग्णालयांची तपासणी करून 540 रुग्णालयांना नोटीस बजावण्यात आली आहे. लातूर मंडळांतर्गत 1,854 रुग्णालयांची तपासणी करून 236 रुग्णालयांना नोटीस देण्यात आली आहे. कोल्हापूर मंडळांतर्गत एकूण 1,248 रुग्णालयांची तपासणी करून 351 रुग्णालयांना नोटीस देण्यात आली आहे. अकोला मंडळांतर्गत एकूण 1,912 रुग्णालयांची तपासणी करून 227 नोटीस देण्यात आली आहे. नागपूर मंडळांतर्गत एकूण 1,027 रुग्णालयांची तपासणी करून 257 रुग्णालयांना नोटीस बजावण्यात आली आहे.

आरोग्य विभागाने याबाबतचा आदेश काढला आहे. व या आदेशानुसार, महाराष्ट्र शुश्रूषागृह नोंदणी नियम, 2021 अंतर्गत राज्यातील नोंदणीकृत खासगी रुग्णालयांची तपासणी करण्यात येत आहे. रुग्णालयांकडून वैद्यकीय

आस्थापना कायद्यासह इतर नियमांचे पालन होते का, याची तपासणी प्रामुख्याने केली जात आहे. नियमावलीनुसारच रुग्णालयांची तपासणी केली जाणार असून, डॉक्टरांना यात त्रास देऊ नये, अशी सूचनाही अधिकाऱ्यांना करण्यात आली आहे.

आरोग्य सेवा आयुक्तालयाकडून दि. 05/01/2025 रोजीच्या पत्रान्वये सर्व जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा आरोग्य अधिकारी आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका यांना दि. 05/02/2025 रोजी पर्यंत त्यांच्या कार्यक्षेत्रात नोंदणी झालेल्या सर्व खासगी रुग्णालयांच्या तपासण्या पुर्ण करण्याबाबतचे उद्धिष्ट ठरवुन देण्यात आले होते. सदर तपासणी मोहिमेमध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेल्या मापदंडानुसार खाजगी रुग्णालयांकडून रुग्णसेवा पुरविण्यात येते किंवा कसे याबाबतची तपासणी करण्याबाबतच्या सुचना आयुक्तालयाकडून संबंधीतांना देण्यात आल्या.

- शुश्रुषागृहाचे भौतिक रचना व निकष
- शुश्रुषागृहासाठी किमान आवश्यक असलेल्या बाबी
- शस्त्रक्रीयागृहांसाठी किमान आवश्यक असलेल्या बाबी
- अतिदक्षता विभागासाठी किमान आवश्यक असलेल्या बाबी
- सुतिकागृहासाठी किमान आवश्यक असलेल्या बाबी
- रुग्ण हक्क संहितेचे पालन करणे
- शुश्रुषागृहात दरपत्रक प्रसिध्द करणे
- आपत्कालिन वैद्यकीय सेवा पुरविण्याबाबतच्या निकषांची पुर्तता
- शुश्रुषागृहांकडून रुग्णसेवा पुरविल्याबाबतची नोंदवहीची तपासणी
- अग्नी सुरक्षेबाबतचे ना-हरकत प्रमाणपत्र

त्यानुसार राज्यभरात खासगी रुग्णालयांची तपासणी मोहिम राबविण्यात आली असून एकुण 19,388 शुश्रुषागृहांची तपासणी राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून करण्यात आली असून उपरोक्त 10 मापदंडानुसार पूर्तता करीत नसलेल्या 2,936 शुश्रुषागृहांना 1 महिन्याच्या आत त्यांची पूर्तता करण्याबाबतच्या लेखी सूचनादिल्या आहेत. एक महिन्याच्या आत त्याची पूर्तता न करणाऱ्या शुश्रुषागृहांवर बॉम्बे नर्सिंग ॲक्ट 1949 (सुधारित 2021) नुसार कार्यवाही करण्यात येईल.

---

## गरोदर मातेचा आहार

गरोदर मातेने दिवसभरातील आहार विभागून घ्यावा.

गरोदर मातेने रोजच्या जेवणापेक्षा एक वेळचे जेवण जास्त करावे.

गरोदर मातेने समतोल आहार घेतला पाहिजे. त्यामध्ये कडधान्य, डाळी, दूध, तेल, तुप, फळे व सर्व प्रकारच्या भाज्यांचा समावेश असावा.

आहारात भरपूर पालेभाज्या व मोसमी फळांचा समावेश करावा.

चिक दुधातील जीवनसत्व 'अ'चे प्रमाण वाढविण्यासाठी गर्भावस्थेच्या शेवटच्या टप्प्यात रोज गाजर खावे.

प्रसूती दरम्यान जीवनसत्व 'ड' मिळविण्यासाठी रोज सूर्यप्रकाशात बसावे.

### गरोदर मातेचा आहार

- चार भाकरी किंवा साडेसात पोळ्या.
- दोन वाट्या भात.
- 1/2 वाटी वरण / उसळ.
- 2 वाटी शिजलेली पालेभाजी.
- 2 वाटी इतर भाजी (शिजलेली)
- 2 वाटी कंदभाजी
- 2 नग (200 ग्रॅम) मोसमी फळ
- 1/4 कप दूध
- तेल/तूप 7 चमचे
- साखर / गूळ 6 चमचे



# कुष्ठरोग
# सामाजिक कलंक आणि भेदभाव

कुष्ठरोगावर सामाजिक कलंकामुळे उपचार करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी कुष्ठ रोगावर 100% गुणकारी अशी प्रभावी औषधे असताना आपण अजूनही कुष्ठ रोगाचे उच्चाटन का करू शकलो नाही याचा आपण गांभीर्याने विचार केला पहिजे. ज्यावेळी आपण याचा बारकाईने विचार करतो त्यावेळी असं आढळून येते की कुष्ठरोगाच्या बाबतीत असलेले अनेक गैरगमज अंधश्रद्धा आणि यातूनच निर्माण झालेले भेदभाव पूज्य महात्मा गांधीनी परचुरे शास्त्री या कुष्ठ पीडिताची सेवा शुश्रूषा केली आणि म्हणून आपण त्यांच्या पुण्यस्मरणाच्या दिवसापासून पुढे पंधरा दिवस भारतभर कुष्ठ रोग निर्मूलन पंधरवडा साजरा करतो. याचा प्रमुख उद्देश म्हणजे कुष्ठ पीडितांमध्ये तसंच इतर समाजातील घटकांमध्ये या रोगाविषयी जनजागृती निर्माण व्हावी. 20 व्या शतकापर्यन्त कुष्ठरोगावर काहीच औषधी उपाययोजना नव्हती. केवळ 'हेपसोन' सारखी औषधे एक उपचार म्हणून दिली जात होती. त्यामूळे एखाद्याला कुष्ठ रोगाची लागण झाली की हा रोग वाढतच जायचा. आणि कालांतराने नाक, कान, ओघळणे हातापायाची बोटे झडणं डोळे लाल होणे पापण्या न मिटणे ही लक्षणं दिसायला लागायची आणि विद्रूपते मूळे लोकं अशा लोकांचा तिरस्कार करायला लागायचे, पण त्या वेळी त्या तिरस्कारला तोंड देण्या शिवाय दूसरा उपायही त्यांच्याकडे नव्हता

### त्वचेवरील डाग हे कुष्ठरोगाचे प्राथमिक लक्षण

हा भेदभाव का निर्माण झाला विद्रूपपणामुळे सामान्य माणसे अशा लोकांना जवळच करत नसत. भरीस भर म्हणून त्यांच्या विषयी अपप्रचार करायला लागायचे. त्यामागे अंधश्रद्धा हाही एक भाग असायचाच. उदाहरणार्थ कुष्ठरोग हा एक दैवी कोप आहे. आम्हा कोणाला झाला नाही मग यालाच कसं झाला. याने काहीतरी पाप केले असले पाहिजे. या जन्मी नाही तर गेल्या जन्मी तरी नक्कीच केले पाहिजे. नाहीतर याच्या बापाने दादाने तरी केलं असलं पाहिजे. याचे दुष्परिणाम म्हणजे सर्व समाजच त्याचा तिरस्कार करू लागला एवढच नव्हे तर स्वतः च्या कुटुंबातही त्याची अवहेलना व्हायला लागली. परिस्थिति इतकी आवाक्या बाहेर गेली की अनेक कुटुंबातून अशा लोकांना हद्द पर व्हावे लागले. आणि मग त्यातूनच निर्माण झाल्या कुष्ठकॉलनी. अजूनही भारतात 700-800 कुष्ठ कॉलनी आहेत आणि त्यात नवे जूने कुष्ठ रोगी जे पूर्णपणे बरे झालेले आहेत ते राहतात. पण त्या वेळी काही उपायच नव्हता. एखाद्या जनवारांपेक्षाही त्यांची स्थिती वाईट.

### दुर्लक्षपणाचे दुष्परिणाम

अनेक गैरसमजुतीः अंधश्रद्धेशिवाय आणखीन गैरसमजुती म्हणजे हा रोग अत्यंत संसर्गजिन्य आहे, हा एकाचा दुसऱ्याला तात्काळ होतो वास्तविक हा रोग अतिशय कमी प्रमाणात एकाचा दुसऱ्याला होतो तेही जर एखादी व्यक्ति या रोगाला संवेदनशील असेल आणि ती एखाद्या पॉजिटिव्ह कुष्ठ रोग्याच्या संपर्कात बऱ्याच वेळा आला म्हणजे एकाच घरात एकाच बिछान्यावर एकत्र राहीला तर ह्या रोगाची लागण होण्याची संभावना वाढते नाहीतर नॉर्मली 95 ते 98 1 लोक हे नैसर्गिक रित्याच कुष्ठरोगाला प्रतिबंधित (इम्यून) असतात हा रोग स्पर्शाने देखिल होतो. हा रोग स्पर्शाने होत नाही हा रोग 'मायको बैक्टरियम लेप्री' या बॅक्टीरिया मूळे हवेतून कुष्ठरोग्याच्या स्वासातून आणि थुकीतून होण्याची शक्यता असते. हा रोग आनुवंशिक आहे हा गैरसमज आहे. त्यामुळे कुष्ठ पीडितांच्या मुलांना कुष्ठरोग होण्याची शक्यता नसते. जनतेमध्ये प्रसिद्धी व जनजागृती कुष्ठरोगाकडे दुर्लक्ष केल्यामूळे कुष्ठपीडित हे अपांगत्वाचे शिकार होतात. यामध्ये आणखीन एक महत्वाचे कारण म्हणजे हा रोग दुखत नाही खुपत नाही त्यामुळे याकडे दुर्लक्ष करण्याचे प्रमाण जास्त असते. अगदी बाह्य लक्षणे दिसायला लागल्यावर कुष्ठपीडित औषधोपचारा साठी धावपळ करू लागतो पण जे अपांगत्व आलेले असते ते मात्र तसंच राहते त्यामुळे तो विद्रूप दिसायला लागतो आणि त्याच्या ह्या विद्रूप पणा मूळे परत तिरस्कारचा बळी पडतो असे हे दुष्ट चक्र सुरू राहते. कुष्ठपीडितांना एकाकी पडायचे त्यांना सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी करून घ्यायचे नाही, त्यांचा तिरस्कार करायचा. लग्न

समारंभात बोलवायचे नाही. यामुळे कुष्ठपीडित त्याला रोग झाला आहे माहीत असूनही तो समाजापासून लपवून ठेवतो औषधोपचार घेत नाही आणि विकलांग होतो. म्हणून कुष्ठ रोगाविषयी असलेल्या अंधश्रद्धा आणि गैरसमजूती या प्रथम दूर केल्या गेल्या पाहिजेत.

विद्रूपपणामुळे सामान्य माणसे अशा लोकाना जवळच करत नसत. भरीसभर म्हणून त्यांच्या विषयी अपप्रचार करायला लागायचे. त्यामागे अंधश्रधा हाही एक भाग असायचाच, उदाहरणार्थ कुष्ठरोग हा एक दैवी कोप आहे. आम्हा कोणाला झाला नाही मग यालाच कसं झाला, याने काहीतरी पाप केले असले पाहिजे या जन्मी नाही तर गेल्या जन्मी तरी नक्कीच केले पाहिजे. नाहीतर याच्या बापाने, दादाने तरी केलं असलं पाहिजे. याचे दुष्परिणाम म्हणजे सर्व समाजच त्याचा तिरस्कार करू लागला एवढच नव्हे तर स्वतः च्या कुटुंबातही त्याची अवहेलना व्हायला लागली परिस्थिति इतकी आवाक्या बाहेर गेली की अनेक कुटुंबातून अशा लोकांना हद्द पर व्हावे लागले. आणि मग त्यातूनच निर्माण झाल्या कुष्ठकॉलनी, अजूनही भारतात 700-800 कुष्ठ कॉलनी आहेत आणि त्यात नवे जूने कुष्ठ रोगी जे पूर्णपणे बरे झालेले आहेत ते राहतात. पण त्या वेळी काही उपायच न्हवता. एखाद्या जनवारांपेक्षाही त्यांची स्थिति बाईट होती. अंधश्रध्ये शिवाय आणखीन गैरसंमजुती म्हणजे हा रोग अत्यंत संसर्गजन्य आहे. हा एकाचा दुसऱ्याला तात्काळ होतो वास्तविक हा रोग अतिशय कमी प्रमाणात एकाचा दुसऱ्याला होतो तेही जर एखादी व्यक्ति या रोगाला संवेदनशील असेल आणि ती एखाद्या पॉजिटिव्ह कुष्ठ रोग्याच्या संपर्कात बऱ्याच वेळा आला म्हणजे एकाच घरात एकाच बिछान्यावर एकत्र राहीला तर ह्या रोगाची लागण होण्याची संभावना वाढते नाहीतर नॉर्मली 95 ते 98 4 लोक हे नैसर्गिक रित्याच कुष्ठरोगाला प्रतिबंधित (इम्यून) असतात. अक्षम्य दुर्लक्ष केल्यामुळे कुष्ठपीडित विकलंगपणाला बळी पडतात. विद्रूप दिसायला लागतात. आणि त्यातूनच त्यांच्यात न्यून गंड निर्माण होतो, स्वतः च एकांतवासात जातात, एकमेकात मिसळत नाहीत. त्यामुळे समाजातील लोकांची वागणूक सुध्या नकारात्मक असते. शिवाय आपल्या मुलांबाळांचे काय? त्यांची शिक्षणं, लग्नं कशी होणार याची चिंता त्यांना लागलेली असते. त्यामुळे आपण सातत्याने समाजातील सर्व स्थरातील लोकांवर हे बिंबवले पाहिजे की कुष्ठरोग हा MDT औषधाने पूर्णपणे बरा होतो, ही औषधे सरकारी इस्पितळात फुकट मिळतात. त्वरित उपचार केल्यास रुग्ण विकलांग होत नाही. आपल्याला कुष्ठरोगावर विजय मिळवायचा आहे. आपल्या संपर्कात असलेल्या ओळखीच्या अनोळखी व्यक्ति बाबत शंका आल्यास त्याची हेटाळणी न करता त्याला सरकारी इस्पितळात जपण्यासाठी प्रवृत्त करा. त्याच्या बद्दलची माहिती गोपनीय ठेवा त्याचा गाजावाजा करू नका. गावातल्या सर्वांनी हे ठरवले तर कुष्ठरोगी शोधून काढण्यात मदत होईल. त्यात अनेक गिरणी कामगार असतात. बीट कामगार असतात. ही कामावरची माणसे सकळीच उठून कामावर जातात. आणि मग कुष्ठरोग शोध मोहिमेत ती सापडत नाहीत म्हणून प्रत्येकाने आपले शेजारी पाजारी या सर्वांच्या सहकार्याने कुष्ठरोगी शोधून काढायला हातभार लावला पाहिजे. तरच आपण कुष्ठ रोगाचे उच्चाटन करू शकू.

**शरद भोसले,**
कार्यकारी संचालक,
आंतरराष्ट्रीय कुष्ठ निवारण संस्था, पुणे



# मी आरोग्य विभाग बोलतोय...!

जन्माच्या पहिल्या श्वासापासून तर शेवटच्या श्वासापर्यंत तुमच्या आरोग्याची संपूर्ण जबाबदारी माझ्यावर आहे!

तुमच्या जीवनाच्या प्रत्येक टप्प्यावर—गर्भधारणा, बालपण, तारुण्य, प्रौढत्व आणि वार्धक्य—मी, आरोग्य विभाग, सदैव तुमच्या सेवेत तत्पर आहे. बीसीजी (BCG) पासून ईसीजी (ECG) पर्यंत, प्रत्येक क्षणी तुमच्या आरोग्याची काळजी घेणारा एक विश्वासू सहचर म्हणून मी सदैव सज्ज आहे.

**1.सुरक्षित मातृत्व: प्रत्येक आई व बाळासाठी प्रेमळ सेवा**

जेव्हा एका नव्या जीवाचा प्रवास सुरू होतो, तेव्हाच माझी जबाबदारी सुरु होते! गरोदरपणाच्या पहिल्या दिवसापासून ते बाळाच्या जन्मापर्यंत, मी तुम्हाला नोंदणी, सोनोग्राफी, रक्त तपासण्या, आवश्यक औषधोपचार, मोफत प्रसूती सुविधा व संदर्भ सेवा प्रदान करतो.

प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान, मानव विकास मिशन, जननी सुरक्षा योजना यांच्या माध्यमातून मी गरोदर मातांना मोफत आरोग्य सेवा आणि आर्थिक सहाय्य देखील पुरवतो, जेणेकरून कोणत्याही आईवर आर्थिक ताण येऊ नये.

सुरक्षित प्रसूती ही सुखद मातृत्वाची पहिली पायरी आहे, आणि त्यासाठी मी कायम तुमच्या सोबत आहे!

**2 बाल आरोग्य आणि लसीकरण: तुमच्या बाळाच्या उज्ज्वल भविष्यासाठी**

मुलांच्या पहिल्या टप्प्यापासून 16व्या वर्षापर्यंत आवश्यक लसीकरण मी पूर्णपणे मोफत करतो, कारण सुरक्षित बालपण हेच निरोगी भविष्यासाठी पहिलं पाऊल आहे.

टिटॅनस, पोलिओ, डिप्थेरिया, रुबेला, गोवर अशा जीवघेण्या आजारांपासून तुमच्या मुलांना वाचवण्यासाठी, लसीकरणाशिवाय कोणताही पर्याय नाही!

एक छोटीशी सुई, पण मोठा संरक्षण कवच!

**3 कुटुंब नियोजन: जबाबदारीने घेतलेला निर्णय, आनंदाने जगलेले आयुष्य!**

मी तुमच्या कुटुंबाच्या भल्यासाठी सर्व स्त्री आणि पुरुष कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करतो.

आरोग्यपूर्ण निर्णय घेऊन कुटुंबाचे आरोग्य आणि आर्थिक स्थैर्य राखण्याचा संकल्प मी तुमच्या सोबत आहे!4 मोफत बाह्यरुग्ण सेवा व औषधोपचार

कोणताही आजार छोटा समजू नका! प्रत्येक तपासणी, प्रत्येक प्रयोगशाळा चाचणी आणि आवश्यक औषधोपचार पूर्णपणे मोफत आहेत.

गरज भासल्यास मी तुम्हाला योग्य तज्ञांकडे संदर्भित करतो, कारण तुमचे आरोग्य सर्वात मोठी संपत्ती आहे!

**5 आंतररुग्ण सेवा: गरजेच्या वेळी उपचार तुमच्या सोबत!**

शस्त्रक्रियेनंतर देखभाल असो किंवा दीर्घकालीन आजाराचे उपचार, मी तुमच्या सेवेसाठी सदैव उपलब्ध आहे.

प्रत्येक रुग्णाला निवासी डॉक्टर आणि परिचारिकांची 24x7 सेवा आणि मोफत औषधोपचार दिले जातात.

**6 सर्पदंश व श्वानदंश उपचार: प्रत्येक जीव महत्वाचा!**

साप, कुत्रा किंवा कोणत्याही अनोळखी प्राण्याच्या चाव्यामुळे घाबरु नका! मी आवश्यक ती लस, औषधोपचार आणि त्वरित आपत्कालीन सेवा देतो.

दोन थेंब इंजेक्शन, अनमोल जीव वाचविण्याची खात्री!

**7 अपघात आणि न्यायवैद्यकीय प्रकरणे: गरजेच्या वेळी मदतीसाठी तत्पर!**

कोणत्याही अपघाताच्या वेळी मी तुमच्या सोबत आहे.

पोलीस तपासणी, शवविच्छेदन, अपघातानंतरच्या वैद्यकीय चाचण्या आणि इतर सर्व सेवांसाठी मी तत्पर आहे.

**8 मोफत रक्त, लघवी आणि थुंकी तपासण्या**

आजार शोधण्याचे पहिले पाऊल म्हणजे योग्य निदान!

रक्त, लघवी, थुंकी आणि इतर प्रयोगशाळा तपासण्या मी पूर्णपणे मोफत करतो.

वेळीच निदान = वेळीच उपचार = निरोगी आयुष्य!

**9 कुष्ठरोग आणि क्षयरोग उपचार: आरोग्यपूर्ण समाजासाठी लढा!**

कुष्ठरोग आणि क्षयरोग (TB) यांना लपवू नका, उपचार घ्या!
मी संशयित रुग्णांचा शोध घेतो, त्यांचे मोफत औषधोपचार करतो आणि सतत देखभाल करतो.
एड्स आणि इतर गंभीर आजारांबाबत समुपदेशन आणि आरोग्य शिक्षण
"माहिती = संरक्षण!" एड्स, क्षय, मधुमेह, हृदयरोग आणि इतर आजारांबद्दल मी मोफत समुपदेशन, चाचण्या आणि उपचार उपलब्ध करून देतो.
स्वतःची काळजी घ्या, निरोगी जीवनशैली अंगीकारा!
तुमच्या प्रत्येक श्वासासाठी, मी आहे...!

***मी आरोग्य विभाग!***
***तुमच्या आरोग्याचा रक्षक, तुमच्या कुटुंबाचा साथी!***
***निरोगी महाराष्ट्र, समृद्ध महाराष्ट्र!***

## प्रतिबंधक उपाययोजनांमुळे अतिसाराच्या संसर्गापासून तुमच्या बालकाचे संरक्षण होऊ शकते

- योग्य स्वच्छता
- पहिले सहा महिने निव्वळ स्तनपान
- पिण्याचे स्वच्छ पाणी
- 'अ' जीवनसत्वाची पूरक मात्रा
- जलसंजीवनी (ओआरएस) चे द्रावण, झिंक आणि स्तनपान व पूरक आहार चालू ठेवा
- रोटाव्हायरसची लागण होऊ नये यासाठी लसीकरण

**आवश्यक असल्यास नजीकच्या आरोग्य संस्थेमध्ये किंवा आशा यांच्याशी संपर्क साधा**

# उसतोड मजुरांसाठी आरोग्य शिबिरे

महाराष्ट्रात दिडशेच्या जवळपास साखर कारखाने आहेत. त्या साखर कारखान्यांवर महाराष्ट्र आणि कर्नाटक, आंध्र, गुजरात राज्यातील असे एकूण 12 ते 14 लाख ऊसतोड कामागारांची आवश्यकता असते. या पैकी किमान 6 लाख ऊसतोड कामगार हे बीड जिल्ह्यातून पुरवले जातात उर्वरित मजूर हे बीड जिल्ह्याच्या जवळ असणाऱ्या जिल्ह्यातील तालुक्यामधून जातात. उदा. जालना जिल्ह्याच्या अंबड तालुका, लातूर जिल्ह्याच्या रेणापुर तालूका व परभणी जिल्ह्याच्या पाथरी तालुका या ठिकाणावरुन पुरवले जातात.

पश्चिम महाराष्ट्रातील पुणे, सातारा व सोलापूर जिल्ह्यातील सुमारे 65 साखर कारखान्यात काम करण्यासाठी उसतोड मजुर स्थलांतरीत होतात. उसतोड कामासाठी त्यांना साधारणत: सहा महिने त्यांच्या मूळ निवासाच्या ठिकाणावरुन विस्थापित होवून उघड्या मैदानावर, माळरानावर खोपी करुन रहावे लागते. आर्थिक व शैक्षणिक दुर्बलतेमुळे त्यांना आरोग्याबाबत समस्या निर्माण झाल्यास ते स्वत: आरोग्य संस्थेमध्ये जाऊन उपचार घेण्याची शक्यता कमी असते.

डॉ. राधाकिशन पवार, उपसंचालक, आरोग्य सेवा, पुणे मंडळ पुणे हे बीड जिल्ह्याचे भूमीपुत्र असून त्याना उसतोड मजुरांच्या आरोग्य विषयक समस्यांची सखोल जाणीव असल्याने त्यांचे विशेष प्रयत्नातून उसतोड मजुरांसाठी विशेष आरोग्य शिबिरे घेण्याचा अभिनव उपक्रम योजण्यात आला आहे.





त्यांचे मार्गदर्शनानुसार उसतोड मजुर व त्यांचे सोबत असलेले कुटुंबीय हे आरोग्य सेवेपासुन वंचित राहु नयेत यासाठी आरोग्य विभाग पुणे मंडळामार्फत उसतोड मजुरांसाठी विशेष आरोग्य शिबिरे घेण्याचा उपक्रम राबविण्यात येत आहेत. सदर शिबिरे ही महिन्याच्या पहिल्या व तिस-या शुक्रवारी त्या त्या भागातील वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य सहाय्यक, आरोग्य सहायिका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका व आशा कार्यकर्ती यांच्या माध्यमातून उसतोड मजुरांच्या सोयीच्या वेळेत त्यांच्याच वस्तीच्या ठिकाणी जावुन घेण्यात येतात.

**या शिबिरांमध्ये ऊसतोड मजुरांसाठी पुढील आरोग्य सेवा देण्यात येत आहेत**

- ऊसतोड मजुरांच्या कुटुंबातील गरोदर माताची आरोग्य तपासणी व लसीकरण
- संशयित रुग्ण कुटुंबातील पाच वर्षाखालील बालकांचे लसीकरण तसेच बालकांच्या आजाराची तपासणी व उपचार
- ऊसतोड मजुरांसाठी क्षयरोग, कुष्ठरोग या सांसर्गिक आजारांची तपासणी व संदर्भ सेवा
- ऊसतोड मजुरांमधील उच्चरक्तदाब अथवा मधुमेहाचे रुग्ण शोधून त्यांचेवर उपचार सुरु करणे.
- मुखाच्या कर्करोगाचे संशयित रुग्ण, ऊसतोड महिला मजुरांमधील स्तनाच्या व गर्भाशयाच्या कर्करोगाचे संशयित रुग्ण शोधून त्यांना पुढील तपासण्या व उपचारांसाठी संदर्भित करणे

या उपक्रमाअंतर्गत आतापर्यंत प्रामुख्याने सोलापूर येथील श्री विठ्ठल सहकारी साखर कारखाना, गुरसाळे, विठ्ठल सहकारी साखर कारखाना, पंढरपूर, जयहिंद सहकारी साखर कारखाना प्रा. लि., आचेगाव, श्री संत कुर्मदास सहकारी साखर कारखाना लि., पडसाळी, पुणे जिल्ह्यातील श्री विघ्नहर सहकारी साखर कारखाना लि., निवृत्तीनगर, दौंड शुगर प्रा. लि.,आलेगाव, बारामती ॲग्रो लि., शेटफळगड तर सातारा जिल्ह्यातील पाडळ सहकारी साखर कारखाना, खटाव, श्री दत्त इंडिया साखरवाडी, किसनवीर सहकारी साखर कारखाना म्हावशी, लोकनेते बाळासाहेब देसाई साखर कारखाना, मरळी येथील ऊसतोड मजुरांना आरोग्य सेवा पुरविण्यात आल्या आहेत.

**दि. 10 फेब्रुवारी 2025 पर्यंत उसतोड कामगारांना शिबिरांमधून देण्यात आलेल्या आरोग्य सेवांचा तपशील**

| | पुणे | सातारा | सोलापूर | पुणे मंडळ |
|---|---|---|---|---|
| साखर कारखान्यांची संख्या | 15 | 17 | 33 | 65 |
| मोहीमेमध्ये आजपर्यंत घेण्यात आलेली शिबीरे | 11 | 78 | 43 | 132 |
| तपासणी करण्यात आलेले लाभार्थी | 2999 | 6664 | 4660 | 14323 |
| तपासणी करण्यात आलेली बालके | 674 | 703 | 848 | 2225 |
| लसीकरण करण्यात आलेली बालके | 123 | 387 | 559 | 1069 |
| तपासणी व आवश्यक सेवा पुरविण्यात | | | | |
| आलेल्या गरोदर माता | 63 | 206 | 120 | 389 |
| आढळून आलेले संशयित क्षयरुग्ण | 4 | 0 | 0 | 4 |
| आढळून आलेले संशयित कुष्ठरुग्ण | 42 | 25 | 16 | 83 |
| आढळून आलेले संशयित मुखकर्करोग रुग्ण | 9 | 0 | 0 | 9 |
| आढळून आलेले संशयित स्तन अथवा | | | | |
| गर्भाशयमुख कर्करोग रुग्ण | 0 | 0 | 0 | 0 |
| आढळून आलेले मोतिबिंदू रुग्ण | 9 | 6 | 9 | 24 |
| संदर्भित करण्यात आलेले रुग्ण | 32 | 38 | 35 | 105 |

# 376 लाडक्या बहिणींच्या हाती कोयता अन् पोटात बाळ

बीड : बीडचे लाखो मजूर सहा महिन्यांसाठी घर सोडून राज्यासह कर्नाटक, आंध्र प्रदेश, गुजरातमध्ये ऊसतोडणीसाठी जातात. त्यांची आरोग्य तपासणी केली असता त्यात 376 महिला या गर्भवती असल्याचे समोर आले. पोटात बाळ असतानाही या लाडक्या बहिणी हातात कधी कोयता तर कधी डोक्यावर ऊसाची मोळी घेऊन पहाटेपासून कष्ट करत आहेत.

पुणे, सोलापूर, सातारा या जिल्ह्यांतील जवळपास 65 साखर कारखान्यांवर बीडचे ऊसतोड मजूर जातात. शेजारील जालना, लातूर, परभणी जिल्ह्यांतील मजुरांचाही समावेश असतो. सहा महिने घर सोडून उघड्या मैदानावर, माळरानावर खोपी करून त्यांना राहावे लागते. आरोग्याच्या समस्यांकडे दुर्लक्ष करतात. हाच धागा पकडून आरोग्य विभाग, पुणे मंडळामार्फत या मजुरांसाठी विशेष आरोग्य शिबिरे घेण्यात येतात. प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या शुक्रवारी उसाच्या फडात, खोपीवर जाऊन तपासणी केली जाते. बीडचे भूमिपुत्र तथा पुण्याचे उपसंचालक डॉ. आर. बी. पवार यांच्याकडून हा उपक्रम राबविला जात आहे.

**ऊसतोड मजुरांसाठी पुरविल्या जातात या सुविधा:-**

गरोदर मातांची तपासणी व लसीकरण, पाच वर्षांखालील बालकांचे लसीकरण, बालकांच्या आजाराची तपासणी व उपचार, क्षयरोग, कुष्ठरोग आदी आजारांची तपासणी व संदर्भ सेवा, उच्च रक्तदाब व मधुमेहाचे रुग्ण शोधून उपचार, स्तन, गर्भाशय व मुखाच्या कर्करोगाचे संशयित रुग्ण शोधून उपचार करणे.

**अशी आहे आकडेवारी:-**

आरोग्य शिबिरे - 128, तपासलेले लाभार्थी - 13,977
तपासलेली बालके - 2,100, संशयित क्षयरुग्ण - 4
लसीकरण केलेली बालके - 1,044, गरोदर माता - 376
संशयित कुष्ठरुग्ण - 81, मुख कर्करोग रुग्ण - 4
मोतिबिंदू रुग्ण – 21, रेफर केलेले रुग्ण – 89

**"ऊसतोड मजुरांच्या तपासणीसाठी आरोग्य शिबिरे घेतली जातात. यात गरोदर माता, लहान मुलांची तपासणी करून आजारानुसार उपचार केले जातात."**

**– डॉ. आर. बी. पवार,**
**उपसंचालक,आरोग्य सेवा, पुणे**

# कुष्ठरोग
# एक सामान्य आजार

राष्ट्रीय कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रम

हा सावकाश पसरणारा जीवाणुजन्य आजार आहे. हॅन्सन या शात्रज्ञाच्या नावावरूनही कुष्ठरोग ओळखला जातो. 1873 साली त्यांनी या रोगाच्या जंतूचा "मायकोबॅक्टेरियम लेप्रि"चा शोध लावला. या जीवाणूच्या संसर्गाने त्वचेमध्ये अस्वाभाविक बदल होतात. त्वचेवर चट्टे उमटतात. त्वचेवरील हे चट्टे वेगवेगळ्या आकाराचे असतात. त्यांची कडा गडद रंगाची आणि मध्यभाग फिकट रंगाचा दिसतो. हे चट्टे पांढरे , लालसर रंगाचे , सपाट किंवा उंचावलेले असतात. त्याच बरोबर याचा परिणाम मज्जातंतूवरही होतो. उपचारास ऊशिर झाल्यास हातातील आणि पायातील परिघवर्ती चेता , नाकाची अंतत्त्वचा, घसा आणि डोळ्यावर परीणाम होतो. संवेदना नाहीशी झाल्याने हाता पायाची बोटे वाकडी होतात. म्हणजे विकृती येते.

मायकोबॅक्टेरियम लेप्रि शरीरातील थंड ठिकाणी वाढतो. त्यामुळे त्वचा, अंतत्त्वचा आणि चेता यामध्ये तो वाढतो. चेतामध्ये वाढल्याने चेता नष्ट होतात आणि त्या भागाची संवेदना नाहिशी होते. हातापायांच्या बोटांची संवेदना नाहिशी झाली की त्यांना इजा होण्याची शक्यता वाढते. व जखमा होतात. बधिरता आल्याने त्रास जाणवत नाही त्यामुळे दुर्लक्ष होते. जखमा वाढतात व पेशी मृत पावतात. अशाने अवयव विद्रूप होतात. यामुळे पूर्वीच्या काळात कुष्ठरोगाचे रुग्ण समाजापासून वेगळे ठेवले जात. त्यांच्यासाठी वेगळ्या वस्त्या असत.

अजूनही समाजात या रोगाबाबत हीन भावना, गैरसमज व अंधश्रद्धा आहेत. हा रोग वेगाने पसरणारा संसर्गजन्य नाही म्हणजे सौम्य संसर्गजन्य आहे. त्याची वाढ अत्यंत सावकाश होते. घरात उपचार घेतलेला कुष्ठरुग्ण असेल आणि कुष्ठरोग्याची तपासणी/उपचार करणारा वैद्यकीय कर्मचारी यांच्यापासून तो पसरत नाही. तो पूर्णपणे बरा होतो. सध्या कुष्ठरोगावर बहुविध औषधोपचार पध्दती ही रामबाण उपचार पद्धती आहे. याने रोग लवकरात लवकर बरा होतो. पहिल्या मात्रेतच त्याचा संसर्ग पसरविण्याचा धोका कमी होतो.

कुष्ठरोगाचे जिवाणू शरीराच्या त्वचेवर परिणाम करत असल्याने केसांची मुळे, घाम येणा-या ग्रंथी, आणि संवेदी चेता यांचा नाश होतो. परिणामी त्वचा कोरडी आणि रंगहीन बनते. त्वचा संवेदनहीन झाल्याने स्पर्शज्ञान होत नाही. चेहरा, हात आणि पायाच्या मज्जातंतू आकाराने मोठ्या होतात. डॉक्टरांना त्या सहज जाणवतात.

**लक्षणे**

त्वचेवरील चट्टे संवेदनाहीन होणे हे कुष्ठरोगाचे पहिले लक्षण आहे. प्रगत अवस्थेत कुष्ठरोगामध्ये नाकाचा आकार मोठा होतो. नाकाच्या अंतत्त्वचेमध्ये कुष्ठरोगाच्या गाठी आल्याने हा परिणाम होतो. चेह-यावर आणि शरीरभर गाठी हे दुसरे लक्षण. कुष्ठ रोग्याना वेदना होत नाहीत असा सर्वसाधारण समज असला तरी परिघवर्ती चेतांच्या टोकांचा दाह होणे ही बहुतेक रोग्यांची नेहमीची तक्रार असते. दाह कमी करण्यासाठी कॉर्टिकोस्टिरॉइड्स द्यावी लागतात. कुष्ठरोगाच्या जिवाणूचा अधिशियन कालावधी सहा महिन्यापासून पाच वर्षे वा अधिक असू शकतो.

**प्रसार**

उपचार न घेतलेल्या रुग्णाच्या नाकातील स्त्रावामध्ये मोठ्या संख्येने एम लेप्रि असतात. ते शिंकले, खोकले की यातून लाखो जंतू बाहेर पडतात. ज्याचा घनिष्ट व वारंवार संपर्क आलेला, ज्यांची कुष्ठरोगा विषयी रोगप्रतिकारक शक्ती कमी आहे अशांना कुष्ठरोगाची लागण होऊ शकते. भारतात कुष्ठरोगाविषयी 95 टक्के लोकांची रोगप्रतिकारक शक्ती चांगली आहे.

**निदान**

संशयित लक्षणांवरुन कुष्ठरोगाचे निदान केले जाते. कुष्ठरोगाची निदानात्मक लक्षणे, संवेदना चाचणी, मज्जातंतू चाचपणी, केल्याने रोग निदान सहज शक्य आहे. काही वेळा आवश्यक असल्यास त्वचा विलेपन तपासणी करून कुष्ठरोगाचे निदान केले जाते. अशा रुगणांचे प्रमाण अत्यल्प आहे. कुष्ठरोगाचे निदानात्मक लक्षणांवरुन दोन प्रकारात वर्गीकरण करून उपचार सुरु करण्यात येतो. 1 ते 5 चट्टे, किंवा एकच मज्जा बाधित असणारे - असांसर्गिक प्रकार. 5 पेक्षा अधिक चट्टे, एक पेक्षा अधिक मज्जा बाधित, त्वचा विलेपन तपासणीत कुष्ठ जंतू आढळलेले रुग्ण - सांसर्गिक प्रकार. कुष्ठरोगाचे निदान सर्व शासकीय निमशासकीय दवाखान्यात मोफत व दररोज केले जाते.

**शरद कुलकर्णी**
अवैद्यकीय सहायक, नागरी कुष्ठरोग केंद्र,
दुधनी - मैंदर्गी, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर.

# प्रेरणेचा प्रकाश : आशाताई यांच्या सेवाभावातून नवजीवनाचा उजाळा

IICARE FOUNDATION द्वारे समर्थित

आशा सेविका म्हणून काम करताना प्रत्येक दिवस नवा अनुभव देतो, नवं आव्हान समोर आणतो. पुलफैल नागरीक आरोग्य केंद्र, वर्धा येथील आशा स्वयंसेविका सौ. अर्चना अमोल कोरडे यांनी गेल्या दोन वर्षांत आपल्या कार्यक्षेत्रात जिद्द, सेवाभाव आणि धैर्य दाखवत उल्लेखनीय कार्य केलं आहे. दारूबंदीच्या कुपरिणामांनी ग्रस्त, कमी शिक्षित आणि गरीब कुटुंबांत आरोग्यविषयक सेवा पोहोचवताना त्यांना अनेक आव्हानांना सामोरं जावे लागले. त्यात लोकांचा विश्वास संपादन करणे, समस्यांचा खोलवर जाऊन शोध घेणे आणि वेळप्रसंगी स्वतःच्या खर्चातून मदत करणे यामुळे त्यांनी अनेकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवले.

**संकटाला सामोरे जाण्याचा प्रसंग :** एके दिवशी अर्चना कोरडे यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील एका अतिशय गरीब कुटुंबाला भेट दिली. त्या घरातील मुलगी गंभीर आजारी दिसत होती. ती नेहमीच अशक्त, उदास, आणि कामात थकलेली वाटत होती. त्या मुलीची तब्येत पाहून अर्चना यांनी तिच्या आईला विचारलं, परंतु घरच्या परिस्थितीची लाज वाटल्यामुळे किंवा भीतीपोटी त्यांनी काहीच सांगितले नाही. मुलीचे वडील दारूच्या नशेत असल्यामुळे त्यांनी अर्चना यांना घराबाहेर काढले. अर्चना त्या कुटुंबाच्या शेजारील घरी गेल्या आणि परिस्थितीचं नीट निरीक्षण केलं. मुलीच्या वडिलांच्या गैरहजेरीत त्यांनी त्या मुलीला आणि तिच्या आईला विश्वासात घेऊन नागरिक प्राथमिक आरोग्य केंद्रात नेले, तेथे तपासणी केल्यावर धक्कादायक गोष्ट समोर आली– मुलीचं हिमोग्लोबीन केवळ 3.5 gm/dL होते, जे अत्यंत गंभीर होते.

**परिस्थितीचा उलगडा :** अर्चना यांनी विचारपूस सुरुच ठेवली आणि अखेर त्या मुलीच्या आईने रडत रडत खरी परिस्थिती सांगितली. दोन महिन्यांपूर्वी त्या मुलीचा गर्भपात झाला होता. या घटनेनंतर कुटुंबातील लोकांनी त्यांना घराबाहेर काढले होते आणि ते पुलफैल भागात एका झोपडीत राहत होते. गरीबीमुळे मुलीला योग्य उपचार मिळाले नव्हते, आणि तिची तब्येत दिवसेंदिवस खालावत होती.

अर्चना यांनी हे सर्व ऐकून वेळ न घालवता गटप्रवर्तक यांना ही माहिती दिली. त्यांनी सल्ला दिला की, मुलीला तत्काळ सामान्य रुग्णालय, वर्धा येथे दाखल करावे.

**तत्परतेने उपचार सुरू :** अर्चना यांनी स्वतःच्या वाहनाने त्या मुलीला आणि तिच्या आईला सामान्य रुग्णालय, वर्धा येथे नेले. तेथील डॉक्टरांनी तपासण्या करुन तिला तात्काळ दाखल केले.

**निरोगी जीवनाची नवी सुरुवात :** सुमारे दोन आठवड्यांच्या उपचारानंतर त्या मुलीची तब्येत हळूहळू सुधारू लागली. रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतरही अर्चना यांनी मुलीची काळजी घेतली. योग्य आहार घेण्याबाबत मार्गदर्शन केले, आज ती मुलगी पूर्णपणे बरी झाली आहे आणि आनंदी जीवन जगत आहे.

**समाजासाठी प्रेरणा :** अर्चना कोरडे यांनी आपल्या कार्यात फक्त आरोग्यसेवा पुरवण्यावरच लक्ष केंद्रित केले नाही, तर प्रत्येक गरजवंताला मदत करण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सेवाभावी कार्यामुळे अनेक कुटुंबांना आधार मिळाला आहे.त्यांना या यशात गटप्रवर्तक, आरोग्य सेविका आणि त्यांच्या संपूर्ण टीमचं मोठं सहकार्य लाभलं. त्यांचे हे कार्य इतर आशा सेविकांसाठीही प्रेरणादायी ठरले आहे.

**"सेवा हीच खरी ओळख" :** अर्चना कोरडे यांच्या प्रयत्नांमुळे त्या मुलीचे जीवन सुरक्षित झाले आणि तिचे कुटुंब नव्या उत्साहाने जगत आहे. त्यांच्या जिद्दीने आणि समर्पणाने एका गरीब कुटुंबाला नवजीवन मिळाले. या यशोगाथेच्या माध्यमातून त्यांनी दाखवलेला सेवाभाव, धैर्य, आणि कणखरता इतरांसाठी आदर्श आहे.

"जिथे संकट आहे, तिथे संधीही असते. गरजवंताला आधार देऊन त्यांचं जीवन सुधारण्यातले समाधान हेच खऱ्या आशा स्वयंसेविकेचे यश असते."

**आशा स्वयंसेविका अर्चना अमोल कोरडे,**

**कार्यक्षेत्र - पुलफैल, वर्धा नागरीक आरोग्य केंद्र, पुलफैल, वर्धा**





# मानसिक आरोग्य

**किशोरवयीन आरोग्य व समस्या**

किशोरावस्था हा प्रत्येकाच्या आयुष्यातील एक विशेष काळ असतो. हा तो काळ असतो जेव्हा मुले मोठी झाल्यासारखे वाटू लागतात व स्वतःला विशेष व्यक्ती म्हणून पाहू लागतात. पौगांडावस्था 11 किंवा 12 वर्षामध्ये सुरु होऊन 19 ने 20 वर्षापर्यंत राहते.

यामध्ये मानसिक आरोग्य समस्या...

**1) उदासीनता :-**

या वयामध्ये कुटुंबांमधील भांडणे, अभ्यासात अडचणी किंवा मित्रांसोबत च्या नातेसंबंधातील समस्यां मुळे उदास होणे या आजाराने मुले ग्रासतात.

**ii) ड्रग्स आणि दारूचा गैरवापर :-**

बरीच किशोरवयीन मुले स्वतःच्या मनावर ताबा ठेवू शकत नाही. विनाकारण आपण खूप मोठे झालो या आर्वीभावामध्ये मद्यपान व धूम्रपान करण्यास सुरुवात करतात व नंतर त्या सवयी मध्ये रुपांतर होतात.



**iii) स्कीझोफ्रेनिया विकसित होणे :-**

हा आजार पौगंडावस्थेत सुरु होतो व हा एक गंभीर स्वरुपाचा आजार आहे. यामध्ये मुले विचित्र वागतात.

लवकर निदान करणे आवश्यक असते.

किशोरवयीन आरोग्य समस्या प्रतिबंध करण्यासाठी

मानसिक आरोग्य शिक्षणामध्ये सहभागी करणे.

शाळांमध्ये विविध उपक्रमाद्वारे किशोरवयीन मानसिक आरोग्य समस्या प्रतिबंध करता येऊ शकतो.

**1) सकारात्मक विचार करणे :-**

पौगंडावस्थेत मुलांचा तोल जाऊ शकतो त्याकरिता त्यांच्यामध्ये सकारात्मक विचार करायला लावणे गरजेचे आहे. त्यांना त्यांच्या परिस्थितीचे सभोवतालच्या वातावरणाचे वास्तव भान ठेवण्यासाठी त्यांच्यामध्ये सकारात्मकता आणून आयुष्यामध्ये काहीतरी चांगले नागरिक होण्याचे ध्येय त्यांच्या मनामध्ये रुजविण्यास त्यांची सकारात्मक ऊर्जा व्यसनाधीनता व इतर गोष्टींकडे नेणार नाही व ते मानसिक आजारांचे बळी पडणार नाही.

**ii) मित्रांशी बोलणे :-**

कधी कधी समस्या सांगण्यासाठी मित्र नसणे ही देखील एक समस्या आहे. मित्रांशी बोलल्याने ताणतणाव कमी होतो. चांगले मित्र करून चांगले नियोजन केल्यास किशोरवयीन मुली चांगले नागरिक बनू शकतात.

**iii) नियोजन :-**

शाळेच्या महत्त्वपूर्ण वर्षामध्ये परीक्षांचे योग्य नियोजन करूण ताणतणाव निर्माण होणार नाही व मानसिक आजार जडणार नाहीत.

शाळा आधारित समुपदेशन किशोरवयीन मुलांना त्यांच्या संबंधित समस्यांवर मार्गदर्शनासाठी शाळा आधारित समुपदेशनाची आवश्यकता असते. सध्या राष्ट्रीय किशोर स्वास्थ कार्यक्रमाअंतर्गत मुलांना समुपदेशन केले जाते. यामध्ये खालील पद्धतीने उत्तम समुपदेशन करता येईल.

**1) ऐकणे :-**

किशोरवयीन मुलांच्या चिंता व समस्या सर्वप्रथम एकूण घेतल्या पाहिजे.

**ii) विचारणे :-**

मनस्थिती व आत्महत्येच्या भावनांबद्दल तसेच मद्यपान, धूम्रपान याबद्दल विश्वासात घेऊन विचारणा केली पाहिजे.

**iii) समस्या सोडविणे :-**

पालकांच्या व शिक्षकांच्या मदतीने किशोरवयीन मुलांमधील त्यांच्या समस्या सोडविल्या तर त्यांच्यामधील असणाऱ्या चिंता व नैराश्य या समस्या निघून जातील.

**स्त्रीरोग आरोग्य आणि मानसिक आरोग्य.**

मानसिक आरोग्याच्या दृष्टीने तीन विशिष्ट प्रकारच्या स्त्रीरोग विषयक समस्या आहेत.

**i) स्त्री रोग विषयक तक्रारी**

विशेषता योनीतून स्त्राव, ओटी पोटातील तीव्र वेदना या स्त्रियांच्या सामान्य तक्रारी आहेत. परंतु अशा तक्रारी असणाऱ्या महिला या नैराश्य किंवा चिंता या मानसिक आजाराने ग्रासित असतात.

**ii) मासिक पाळीच्या तक्रारी :-**

मासिक पाळी पूर्वी अस्वस्थ वाटण्याची तक्रार काही स्त्रियांमध्ये आढळते त्याला प्रीमेनस्ट्रल सिंड्रोम असे म्हणतात. यामध्ये चिडचिड उदासीनता व थकवा या तक्रारी असतात. रजोनिवृत्तीच्या काळात डोकेदुखी, चिंता, झोपेच्या समस्या, थकवा अशा मानसिक आजाराच्या तक्रारी स्त्रिया करत असतात.




**iii) स्त्री रोग विषयक अवयवांवर शस्त्रक्रिया केल्यानंतर तक्रारी :-**

कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया किंवा गर्भाशय काढून टाकल्यानंतर किंवा स्तनावरील शस्त्रक्रियेनंतर महिला नैराश्य किंवा चिंता, चिडचिड, अस्वस्थता या मानसिक आजाराच्या तक्रारी करतात.

**माता आरोग्य आणि मानसिक आरोग्य**

मातृत्व हा स्त्रीच्या आयुष्यातील सर्वात आनंददायक काळ असतो. तरीही हा काळ स्त्रीच्या शरीरात मनात आणि कामात प्रचंड बदलाचा असतो. हे बदल भावनांवर परिणाम करू शकतात. यामध्ये खालील दोन प्रकारच्या मानसिक आजाराच्या समस्या आढळतात.

**i) बाळंतपणानंतर नैराश्य :-**

बालपणाच्या काळात महिलांना नैराश्याच्या धोका असतो दुखी वैवाहिक जीवन घरगुती हिंसाचार स्तनपानाच्या समस्या नवजात बाळाचा मृत्यू किंवा त्याचे आजारपण मुलींचा जन्म या सर्व कारणांमुळे बांधपनानंतर तीव्र नैराश्य या मानसिक आजाराने महिला आजारी पडतात.

**ii) गर्भपात किंवा गर्भधारणा कमी होणे :-**

गर्भपातामुळे नैराश्य येऊ शकते. गर्भपात झाल्याबद्दल स्त्रीला अपराधी वाटू शकते. बाळाचा जन्म देण्याचा अक्षमतेमुळे स्वाभिमान कमी होऊ शकतो तोटा, दुख, शून्यता, राग, अपर्याप्तिता, दोष आणि मत्सर ही लक्षणे आढळून स्त्रियांमध्ये तीव्र निराशय हा मानसिक आजार आढळतो.

**समुपदेशन करून प्रतिबंध करणे :-**

आशा किंवा आरोग्य कर्मचारी यांचेमार्फत गृहभेटीद्वारे किंवा माता बैठकांमध्ये वरील विषयी जनजागृती व समुपदेशन केल्याने बाळंतपणानंतर किंवा गर्भपातानंतर येणारे तीव्र नैराश्य टाळू शकतो.

**डॉ. सुनिल विठ्ठलराव बोराडे**
वैद्यकीय अधिकारी गट - अ




टेलीमानस

व्यसन

उदासिनता, आत्महत्येचे विचार

परीक्षेचा ताण

आंतरवैयक्तिक समस्या

बेचैनी, घबराहट

आपणास व आपल्या कुटुंबातील सदस्यांना वरीलपैकी कोणतेही काही त्रास असल्यास खालील क्रमांकावर संपर्क साधावा...

टेलीमानस टोल फ्री क्रमांक 14416 / 1800-8914416

सार्वजनिक आरोग्य विभाग महाराष्ट्र शासन

/MahaArogyaIECBureau @MahaHealthIEC /mahahealthiec /MahaHealthIEC राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे

# पाच वर्षात ग्रामीण भागातील 44,40,409 रुग्णांनी घेतला टेलिरेडीओलॉजी सेवेचा लाभ

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील शासकीय आरोग्य केंद्रांमध्ये देण्यात येणाऱ्या क्ष-किरण आणि सीटी स्कॅन म्हणजेच टेलिरेडीओलॉजी सेवेचा 44,40,409 रुग्णांनी लाभ घेतला आहे. ग्रामीण भागात क्ष-किरण तज्ज्ञाची कमतरता असल्यामुळे आरोग्य संस्थांमध्ये बाह्यस्थ संस्थेमार्फत ही सेवा पुरविली जात आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अहवालाप्रमाणे, गेल्या पाच वर्षांत 41, 32, 201 रुग्णांनी क्ष-किरण आणि 3, 08, 208 रुग्णांनी सिटी स्कॅन या टेलीरॅडियोलॉजी सेवांचा लाभ घेतला आहे. टेलीरॅडियोलॉजी म्हणजे रेडिओलॉजिकल रुग्णांचे एक्स-रे, सीटी स्कॅन आणि एमआरआय सारख्या प्रतिमा रेडिओलॉजिकल आणि तज्ज्ञ डॉक्टरांशी सामायिक करण्याच्या उद्देशाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी प्रसारित करणे. अनेक चाचण्यांसाठी एक्स-रे आणि सिटी स्कॅन महत्त्वाचा असून त्याचा रिपोर्ट हा टेलिरेडिओलॉजीच्या माध्यमातून तज्ज्ञ डॉक्टरांकडे पाठवून त्यानुसार योग्य उपचाराची दिशा ठरते. त्यामुळे रुग्णाला त्याचे निदान व आरोग्य यंत्रणेमार्फत देण्यात येणारे उपचार तत्काळ मिळण्यास मदत होते.



केंद्र सरकारने जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील आरोग्य संस्थांमध्ये टेलिरेडिओलॉजी सेवा बाह्यस्थ संस्थेमार्फत उपलब्ध करून देण्यात आली आहे. गेल्या पाच वर्षांत म्हणजे सन 2020 ते डिसेंबर 2024 दरम्यान 41,32,201 रुग्णांनी क्ष- किरण आणि 3,08,208 रुग्णांनी सिटी स्कॅन अशा एकूण 44,40,409 रुग्णांनी या सेवेचा लाभ घेतला आहे.

ग्रामीण भागात क्ष-किरण तज्ज्ञाची कमतरता असल्यामुळे ही सेवा सुरू करण्यात आली आहे. टेलिरेडिओलॉजी सेवा बाह्यस्थ संस्थेमार्फत घेण्यासाठी सेवा पुरवठादारासोबत 5 वर्षांसाठी करार करण्यात आलेला आहे. या प्रकल्पानुसार सेवा पुरवठाधारक हे एक्स-रे आणि सीटी स्कॅनच्या डिजिटायझेशन, ट्रान्समिशन आणि रिपोर्टिंगसाठी सी.आर सिस्टम व सॉफ्टवेअर आरोग्य संस्थेमध्ये स्थापित करतात. या सुविधेंतर्गत रुग्णालयात केलेले एक्स-रे आणि सीटी स्कॅनची प्रतिमा सेवा पुरवठादाराने नेमलेल्या तज्ज्ञांकडे ऑनलाईन पाठविल्या जातात. या प्रतिमा तपासून त्याचा अहवाल संबंधित रुग्णास तत्काळ आवश्यकता असल्यास एक तासात आणि इतर रुग्णासाठी 12 तासांत ऑनलाईन पाठविल्या जातात. ग्रामीण रुग्णालय स्तरापर्यंत क्ष-किरण व सीटी स्कॅनची सुविधा राज्यातील जनतेस उपलब्ध झाली आहे. त्यामुळे रुग्णाची निदान आणि उपचाराची दिशा स्पष्ट होते.

टेलिरेडिओलॉजी सेवेमध्ये राज्यातील सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत कार्यरत ग्रामीण रुग्णालये (323), उपजिल्हा रुग्णालये (92), जिल्हा रुग्णालये (23), सामान्य रुग्णालये (5), मनोरुग्णालये (3), कुष्ठरोग रुग्णालये, टीबी हॉस्पिटल(7) व महिला रुग्णालये (11) व इतर (6) या रुग्णालयांचा समावेश करण्यात आलेला आहे. अशा 470 रुग्णालयांमध्ये क्ष-किरणकरिता सीआर सिस्टीम व 8 रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅनकरिता सॉफ्टवेअर स्थापित करण्यात आलेले आहे. टेलिरेडिओलॉजी सेवा पुरवठादारामार्फत आरोग्य संस्थेतील क्ष-किरण तंत्रज्ञ यांना वर्षातून तिमाही प्रशिक्षण दिले जाते.

# मानवी संवेदना आणि भावना संवाद रूपाने व्यक्त करून देणारी कार्यशाळा

नागपूर (१२ फेब्रुवारी) आपण समाजाकडे पाहिले तर असे दिसते की, समाजाच्या गरजेनुसार व्यक्ती वेगवेगळी कार्य करीत असतात व ती सर्वांनी उत्तम रितीने पार पाडावी, यासाठी प्रशासनाच्या वतीने कार्यानुसार व्यक्ती नेमून दिलेली असते. यात कार्यानुसार वेगळेपण असते व प्रत्येक व्यक्तीची भूमिका ही महत्त्वाची ठरत असते.

समुदायात जीवन जगत असताना व्यक्तीकडून ज्या प्रकारच्या कार्याची अपेक्षा केली जाते ते कार्य म्हणजे तिची भूमिका होय. सामाजिक भूमिका म्हणजे विशिष्ट गटात किंवा परिस्थितीत व्यक्तीकडून अपेक्षित असलेली वर्तनिबध्द कार्याची रचना होय. भूमिका म्हणजे वर्तन बंधांचा संच असून त्यात सामाजिकदृष्ट्या संमत समुदायात विशिष्ट स्थानाशी संलग्न असणाऱ्या व्यक्तीची कर्तव्य व हक्क यांचा यात समावेश असतो. व्यक्तीकडून अपेक्षित असलेले वर्तन हे कर्तव्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. व्यक्तीने समूहासाठी स्वीकारलेल्या जबाबदाऱ्या म्हणजेच व्यक्तीची भूमिका होय व या भूमिकेवरून व्यक्तीच्या कार्याचा दर्जाही ठरत असतो. भूमिका हा दर्जाचा कार्यात्मिक पैलू होय. सामाजिक जीवन सुरळीत असणे व नेमून दिलेले कार्य व्यवस्थितपणे पार पाडणे, यासाठी व्यक्तीची भूमिका ही अत्यंत महत्त्वाची ठरते. भूमिका जणू कर्तव्य आणि हक्काची मालिकाच असते. व्यक्तींमधील परस्पर संबंधाचे व कार्याचे प्रतिनिधित्व या भूमिकेच्या माध्यमातूनच घडत असते. भूमिकेला आवश्यक असलेली मनोवृत्ती असल्याशिवाय ती व्यक्ती आपल्या वाट्यास आलेली भूमिका व्यवस्थित पार पाडू शकत नाही, हेही आपण लक्षात ठेवले पाहिजे. अपेक्षित वर्तनासाठी अनुकूल मनोवृत्ती आणि आवश्यक तयारी करून घेण्यासाठी त्या व्यक्तीची अंतर्मनातील भूमिका ही महत्त्वाची ठरत असल्याने नेमून दिलेल्या भूमिका अपेक्षेनुसार पार पडत असतील तर समाज जीवनाचा व परिवर्तनाचा वेग ही वाढत असतो. परिवर्तनाचे वारे जोमाने वाहत असते, परंतु यात मतभेद, शंका, द्वेष असल्यास संघर्ष घडतात. तसेच पार पाडत असलेल्या भूमिका मधूनही परिवर्तनाच्या वाटेत अडथळे निर्माण होतात. कधीकधी कर्तव्य आणि जबाबदाऱ्या याबाबत इतरांकडून आलेल्या अनुभवाबद्दल अथवा अपेक्षांबद्दल व्यक्तीच्या मनात संघर्ष असतो. त्यामुळे कर्तव्य आणि जबाबदाऱ्या बाबत असलेली गोंधळ आणि मतभेद यामुळे संघर्षाची ही परिस्थिती कधी कधी निर्माण होत असते. कर्तव्य पार पाडत असताना व्यक्तीच्या अनेक भूमिका व पैलू तसेच अंतर्मनाला भिडणारे अनुभव हेही भूमिकेच्या दृष्टीने व समाधानकारकपणे काम करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरत असतात.

व्यक्तीचा दर्जा हा केवळ त्याला प्राप्त होणाऱ्या आर्थिक निकषाद्वारे ठरत नसतो, तर त्यांनी निभावलेली सामाजिक दृष्टी व कर्तव्य यावरही ठरत असतो. यावरूनच त्या व्यक्तीला आपण एक समाजाचे महत्त्वाचे घटक आहोत व आपले कामही महत्त्वाचे आहे, याची जाणीव होत जाते आणि या जाणीवेतूनच कर्तव्य प्रयत्नांच्या दृष्टीने चांगले बदल घडत असतात. सार्वजनिक आरोग्य सेवेत कार्य



करणाऱ्या घटकाचा सेवाभाव हा महत्त्वाचा असून मानवी वेदनांशी व वेदनांतून मुक्ती करण्याच्या महत्त्वाच्या कार्यात हा विभाग कार्यरत असल्यामुळे समाजाच्या प्रत्येक घटकासाठी हा विभाग मानवसेवेच्या दृष्टीने महत्त्वाचा आहे, हे नाकारून चालणार नाही. या विभागातील प्रत्येकाची भूमिका ही महत्त्वाची ठरत असते व अटीतटीच्या प्रसंगी अथवा कोणत्याही सोयी सुविधा नसलेल्या ठिकाणी सेवा बजावताना आलेले अनुभव हे मानवी मनाला समृध्द करत असतात. सेवेतून मिळणारे अनुभव हे मानवी सेवांचे असले की या अनुभवांचा दर्जा प्रत्येक मानवाच्या मनात उच्च स्थानी प्रतिबिंबित झालेला असतो. काही प्रसंगी आपल्या भूमिकेतून घडणारे नेतृत्व व त्यातून आलेले अनुभव हे मानवी मनाला सुखद करीत असतात व कार्यकर्त्यांना आलेल्या अडचणींच्या वेदनाही दूर करीत असतात. आपण जाणतो की, प्रत्येक कार्यात नेतृत्वाची, गुणांची भूमिका ही फार महत्त्वाची असते. भावना आणि अंतरंग समजल्यामुळे आव्हानात्मक परिस्थितीतील अनुभव हे मानवाला परिस्थितीशी लढून जगण्यासाठी समृध्द करीत असतात तसेच जगण्याची प्रेरणाही देत असतात.

सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातही सेवा निभावतांना अटीतटीच्या प्रसंगी विविध सेवकांच्या मार्फत सेवांचे दर्शन घडत असते. कठीण परिस्थितीशी झगडून केलेले कार्य हे आरोग्य सेवेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे मानले पाहिजे. मानवी वेदनांना दूर करताना व उपलब्ध असणाऱ्या सेवा सुविधा पुरविताना व उपलब्ध असणाऱ्या ज्ञानाद्वारे व अधिकाराद्वारे त्यावर मात करताना आलेले अनुभव प्रत्येकाच्या मानवी मनाशी घट्ट रुजलेले असतात आणि या अनुभवांना जागृत करण्यासाठी एक नावीन्यपूर्ण कार्यशाळा सार्वजनिक आरोग्य संस्था, नागपूर येथे पार पडली. ध्यानीमनी नसताना आरोग्य सेवेतील घटकासाठी आलेला हा खरच वेगळा अनुभव होता.

**मानवी संवेदना व संवादांची आरोग्य कार्यशाळा**

नागपूर येथील सार्वजनिक आरोग्य संस्थेत विविध प्रकारचे प्रशिक्षण विविध घटकांना देण्यात येते. आरोग्य सेवेतील कार्यरत घटकांसाठी प्रशिक्षणाची या ठिकाणी उत्तम व्यवस्था करण्यात आलेली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाचे सचिव डॉ. निपुण विनायक व श्री. विरेंद्र सिंह यांच्या दूरदृष्टीतून साकारलेली ही कार्यशाळा मानवी संवेदनांना समजून घेऊन विविध घटकांना आलेले अनुभव संवादाच्या माध्यमातून समजून घेण्याचे हे जणू प्रात्यक्षिक, परंतु या प्रात्यक्षिकाची कुणालाही कल्पना नव्हती. आरोग्य सेवेत कार्य करणारे प्रशासकीय अधिकारी, डॉक्टर, परिचारिका, औषध निर्माण अधिकारी, आरोग्य सेवक, सेविका, आशा अशा विविध घटकांना या कार्यशाळेत सामावून घेण्यात आले. या कार्यशाळेत केलेल्या कामाचा आढावा घेण्यात येणार आणि यातून चुकले तर सर्वांच्या समोर आपल्याला बोलणे खावे लागणार, असे समजून सर्वजण या सभेला नव्हे तर कार्यशाळेला आले.

आरोग्य सचिव ही सभा घेणार म्हणून काय परिस्थिती असेल याची जाणीव प्रत्येकाला झालीच! परंतु ही कार्यशाळा अत्यंत वेगळ्या पध्दतीने व मानवी मनातील साठलेल्या अनुभवातील स्पंदनांना जागृत करीत मनातील उत्कृष्ट अनुभवांना उजागर करण्यासाठी असलेलं व्यासपीठ असावं याची पुसटशीही कल्पना कोणालाही आली नाही.. कार्यशाळेच्या सुरुवातीला सर्वांचा परिचय झाला व आरोग्य सेवेतील विविध घटकांना पद, उपाधी बाजूला करून प्रत्येक गटामध्ये समाविष्ट करून प्रत्येकासाठी एक कार्ड देण्यात आले व या कार्डवर सेवा काळातील आलेल्या उत्कृष्ट अनुभवाची व स्मरणात राहिलेल्या अनुभवाची नोंद करण्यास सांगण्यात आले व गटानुसार त्या त्या गटातील प्रत्येक व्यक्तीला आपले अनुभव कथन करण्याविषयी सांगण्यात आले. यात पद आणि भूमिका या बाबी बाजूला ठेवून सर्वांनी यात सहभागी होण्याविषयी आवाहन करण्यात आले. त्याप्रमाणे सर्वांनी आपले पद आणि भूमिका बाजूला ठेवून प्रत्येकाच्या कार्याविषयी व आलेल्या अनुभवाविषयी त्या त्या गटात चर्चा केली व एक तासाच्या अंतराने प्रत्येक गटाला आलेले अनुभव व त्यांनी साठवून ठेवलेल्या अंतर्मनातील अनुभव, आठवणी सर्वांसमोर मांडण्याची संधी देण्यात आली. यात आशा, परिचारिका, डॉक्टर, स्वयंसेवी संस्था यांनी त्यांचे कौशल्य पणाला लावून निभावलेल्या कर्तव्याचे व भूमिकांचे दर्शन त्यांच्या अंतर्मनातील अनुभवातून मांडले. अटीतटीच्या प्रसंगी आपल्या सेवा काळात घडलेल्या कार्याचे व समाज भावनेतून महत्त्वपूर्ण भूमिका आपण कशी पार पाडू शकलो, याचा अनुभव कथन करण्यासाठी या व्यासपीठावर संधी मिळाल्यामुळे त्यांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि सेवाभाव ठळकपणे बोलण्यातून जाणवत होता. सार्वजनिक आरोग्य क्षेत्र हे व्यापक असल्यामुळे प्रत्येक क्षेत्रात दुर्गम भागात तसेच उपलब्ध असणाऱ्या सोयी सुविधांचा विचार करता या सुविधा पुरविताना अनेक अडीअडचणी येतात व त्या अडचणींवर मात करीत दुर्गम भागातील आरोग्य सेवेतील प्रथम स्थानी लढणारी ही मंडळी आपली भूमिका बिकट परिस्थितीतही जबाबदारीने पार पाडून अनेकांचे जीव वाचवतात. त्यांच्या आरोग्य विषयक अडचणींना दूर करण्यासाठी मोलाची मदत करतात. नागपूर विभागातील अतिदुर्गम भागात सेवा प्रदान करताना त्यांना आलेले अनुभव मांडण्यासाठी या कार्यशाळेतील व्यासपीठ महत्त्वाचे ठरले.

सार्वजनिक आरोग्य सेवेत कार्य करणारा प्रत्येक घटक हा अत्यंत महत्त्वाचा व मोलाचा असणारा आहे, याची जाणीव प्रत्येकाला झाली. मानवी मनात साठलेल्या चांगल्या मदतीच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी तसेच आपण करीत असलेले कार्य हे समाजाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण आहे, हे जाणून करीत असलेले कार्य अधिक जोमाने व दर्जेदार कसे करता येईल, यासाठी सकारात्मक ऊर्जा निर्माण होण्यासाठी महत्वाची नक्कीच आहे. मतपरिवर्तनाच्या शक्तीद्वारे समाजामध्ये चांगले बदल घडून येऊ शकतात व परिवर्तनाच्या दृष्टीने प्रेरणादायी वाटचाल होऊ शकते. यासाठी अशा प्रकारच्या कार्यशाळा सार्वजनिक आरोग्य सेवेतील घटकांसाठी किती महत्त्वाच्या आहेत याची जाणीवही प्रत्येकाला झाली. मानवी मनात साठलेल्या मानवतावादी आठवणींना उजाळा देत अनेकांनी आपले अनुभव या कार्यशाळेत व्यक्त केले. आपले कर्तव्य पार पाडत असताना त्यांना आलेले अनुभव व स्वतःच्या गरजा बाजूला ठेवून इतरांना केलेली मदत कशी मन सुखावून जाते याचेही दर्शन त्यांनी या कार्यशाळेत सर्वांना घडवले.

सार्वजनिक आरोग्य सेवा ही दुर्गम, अति दुर्गम भागापर्यंत पोहोचली असून, अशा क्षेत्रात डॉक्टर, परिचारिका, तंत्रज्ञ तसेच आशा स्वयंसेविका, स्वयंसेवी संस्था या कार्यरत आहेत. या कार्यकर्त्यांना वेगळेवेगळे अनुभव येतात, परंतु आलेले अनुभव मांडण्यासाठी त्यांना हवे असते एक व्यासपीठ आणि ते एक व्यासपीठ नागपूर येथील कार्यशाळेने उपलब्ध करून दिले. साठलेल्या मानवी संवेदनेला संवाद रुपाने मांडण्याचा त्यांनी प्रयत्न केला व ते ऐकून घेऊन सार्वजनिक आरोग्य क्षेत्रातील प्रत्येक घटकाचे कार्य किती महत्त्वाचे आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्नही या कार्यशाळेतून सफल झाला. आरोग्यदायी परिवर्तनाच्या दृष्टीने प्रत्येकाची भूमिका महत्त्वाची असून संघ भावनेने केलेले कार्य मानवतेच्या दृष्टीने नक्कीच महत्त्वपूर्ण आहे, अशी अनुभूती कार्यशाळेनंतर सर्वांना आली.

**डॉ. कैलास बाविस्कर**
उपसंचालक, आरोग्य सेवा,
राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, पुणे



# निर्मल संरक्षण

शिरूरला काम करत असतांना खूपदा असे दिसायचे की आई बाळाला दाखवायला येतांना बरोबर बाटली घेऊन दवाखान्यात येत असे. मूल रडायला लागले की त्याला गप्प करायला ती बूच किंवा बाटली त्याच्या तोंडात द्यायची. मूल झोपले किंवा शांत झाले की तोंडातले बूच किंवा बाटली काढून पिशवीत ठेवायची. त्याच पिशवीत बाळाचे चांगले आणि खराब झालेले कपडेही असायचे. बूच वापरतांना खाली पडले तर ते आपल्या साडीला पुसल्यासारखे करून परत बाळाच्या तोंडात घालायची. पोट बिघडले नाही, तरच नवल! असं बघितलं की प्रख्यात बालरोगतज्ञ डेव्हिड मोर्ले यांची आठवण होत असे. त्यांनी त्यांच्या 'बालकांचे पोषण आणि कुपोषण' ह्या जागतिक आरोग्य संघटनेतर्फे प्रसिद्ध करण्यात आलेल्या पुस्तकात लिहिले आहे की मातांच्या हातातील दुधाची बाटली हे एक मुलांना मारण्याचे एक हत्यार (lethal wheapen) आहे.

ग्रामीण भागात गृहभेटीच्या वेळी खूपदा असे दिसायचे की फरशीवर किंवा शेणाने सारवलेल्या जमिनीवर लाह्या – चुरमुरे पसरलेले असायचे आणि मूल एक एक दाणा चिमटीत धरून तो तोंडात घालत असे. आणखी एक खटकणारी गोष्ट म्हणजे, गाय, म्हैस, शेळी, यांसारखी पाळीव जनावरे घरात, अंगणात घराला चिकटून बांधलेली असतात. अशा परिस्थितीत जनवारांपासून होणारे आजार सहज पसरले तर नवल कसले?

मंगळवार पेठेतल्या बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाच्या नागरी आरोग्य केंद्राच्या परिसरातील गृहभेटींच्या वेळी असे प्रकर्षाने जाणवायचे की बायका आपली घरे स्वच्छ ठेवत असत. स्वतः आणि मुले लवकर अंघोळी करून स्वच्छ कपडे घालून तयार असायच्या. त्याबद्दल त्यांना खूप अभिमान असायचा. पण परिसर स्वच्छतेबाबत मात्र त्या उदासीन असायच्या. घरातील कचरा बाहेर झोपडपट्टीतील एखाद्या रस्त्याच्या बाजूला टाकलेला असे. संडासासाठी मुलांना रस्त्यावर बसवित असत. अंघोळीच्या पाण्याचे ओहोळ रस्त्याच्या बाजूला असलेल्या उघड्या गटारांमधून वाहत असत. साहजिकच डास, माशा, उंदीर यांची उत्पत्ती आणि वाढ होत असे. कुत्री अन्न शोधत फिरत असत.

वैयक्तिक स्वच्छते इतकेच परिसर स्वच्छतेचे महत्त्व मातांना समजावून सांगितले पाहिजे. आरोग्य शिक्षणबरोबरच हेही महत्त्वाचे आहे की परिसर स्वच्छतेसाठीच्या सुविधा उपलब्ध आहेत ना हे बघणं आणि नसतील तर त्या पुरवण्यासाठीची कृती करणं. कचरा कुंड्या, त्यातील कचरा वाहून नेण्याची व्यवस्था, स्वयंपाकघरातील आणि न्हाण्यांमधले पाणी वाहून नेण्याची व्यवस्था, तसेच संडासांमधील सांडपाणी वाहून नेण्याची व्यवस्था नगरपालिकांनी पुरवायला हवी. कचराकुंड्यांतून नीटपणे कचरा टाकणे, संडास उपलब्ध झाल्या नंतर त्यांची स्वच्छता ठेवणे ह्यांची जबाबदारी ते वापरणाऱ्या नागरिकांची असते. अन्न, पाणी, आणि परिसराची स्वच्छता ठेवली नाही तर त्या वस्त्यांमधे सर्व प्रकारचे रोग होणारच. खेड्यापाड्यातून आणि झोपडपट्ट्यांतून परिसर स्वच्छतेची हमी घेतल्याशिवाय संसर्गजन्य आणि साथींच्या रोगांचा प्रतिबंध करता येणार नाही.

लहान मुले नाजूक असतात. सर्व प्रकारच्या स्वच्छतेची काळजी घेऊन त्यांच्यातील वरचेवर आजारी पडण्याचा आणि बालमृत्यूचा धोका टाळता आला तरच त्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकेल.त्यांना निर्मलतेचे संरक्षण द्यायला हवे. म्हणजे  बालके सुदृढ राहतील आणि ती चांगली शिकून मोठेपणी आदर्श नागरिक होऊ शकतील.

***सारांश :-***

**मुलांच्या संरक्षणासाठी परिसर स्वच्छता**

- बालक जिथे जन्माला येते, वाढते, शिक्षण घेते, जिथे बालक खेळते तेथील असुरक्षित परिसरामुळे आणि परिस्थितीमुळे अंदाजे 5 दशलक्ष मुले मृत्युमुखी पडतात.
- भारतात 1990 साली सुमारे 40.8% नागरी जनता झोपडपट्टीत रहात होती. त्यातील 96% लोकांना

पिण्यायोग्य पाणी मिळत होते.

- 1990 साली खेड्या-पाड्यातील 86% लोकांना पाणी मिळू शकत होते.
- सन 2011 साली जुलाब आणि पोटाच्या विकरांची बाधा 26.3 दशलक्ष लोकांना झाली आणि 1293 माणसे मृत्युमुखी पडली. पाच वर्षांखालील मृत्यू मधे8%मृत्यू जुलाबांमुळे होतात.
- सन 2011 साली श्वसनमार्गांच्या विकाराने 26.3 दशलक्ष लोक आजारी पडले त्यात 2492 बळी गेले. पाच वर्षांखालील मृत्यूंमधे18% मृत्यू श्वसनसंस्थेच्या विकारांमुळे होतात.
- हिवताप हा एक मोठा आजार आहे. त्यामुळे सुमारे 2 दशलक्ष लोक आजारी पडतात आणि दरवर्षी सुमारे 1000 लोक मृत्युमुखी पडतात.
- सांडपाणी आणि घन कचरा यांची विल्हेवाट करण्याची समस्या मोठी आहे.
- अंदाजे 45 दशलक्ष लोकांना हुकवर्म आजाराची बाधा असते.
- नागरी भागात घनकचऱ्याची व्यवस्था असमाधानकारक आहे.
- पाच वर्षांखालील मुलांना दूषित परिसराचा धोका खूप जास्त प्रमाणात असतो.
- त्यांच्यात खूप मोठ्या प्रमाणात श्वसनसंस्थेच्या रोगांची, हिवताप आणि जंतांची बाधा होते आणि मृत्यूही होतात. आजारपण आणि कुपोषणाचे दुष्टचक्र दिसून येते. खूप मोठ्या प्रमाणात दिसून येणाऱ्या कुपोषणामुळे मुलांच्या वाढीवर आणि विकासावर विपरीत परिणाम होतो.
- सुरक्षित पाणीपुरवठा, सांडपाण्याचा सुरक्षित निचरा, चांगले घर, चांगले पोषण, हवा आणि परिसराची सुरक्षितता असलेले चांगले रहाणीमान ह्यांची गरज आहे.ह्यामुळे कुपोषण आणि पाच वर्षांखालील बालमृत्यूंचे प्रमाण कमी होऊन मुलांना व्यवस्थित वाढीची आणि विकासाची संधी मिळेल.

**डॉ. आशा प्रतिनिधि**

# स्पर्श प्रेमाचा स्पर्श वात्सल्याचा

**'स्तनपान हेच बाळाचे अमृतपान'**

## बाळास मिळणारे फायदे

- आजारांपासून संरक्षण होते
- मातेचे दूध हे परिपूर्ण अन्न आहे
- आरोग्यवर्धक आणि निर्मळ असते
- पचनास सोपे असते



**स्तनपान....**
**विकल्प नसून एक संकल्प आहे.**

कविता

# ॥ निर्मल संरक्षण ॥

शहरे वाढती अफाट,जागा नाही आस-याला
झोपडपट्ट्या खुणावती,दाटीमधे रहायाला
कचरा सांडे कुंड्यांमधुनी, विखुरुनी बाजूला
शोधतात प्राणी त्यात, मिळेल ते खावयाला १

डुकरे, कुत्री, मुले-बाळे, भटकती इतस्थता
वाहाणारे सांडपाणी, सगळीच मलीनता
घर कसले, असे खोली,चिमुकली,अशी तशी
चहूकडे फिरताती,डास, उंदीरआणिकघुशी २

उघड्या गोड अन्नावरती,चिलटे,माशा घोंगावती
चावणारे डास आणि कानी गाणेगुणगुणती
वाहन संख्या फार मोठी,रस्ते छोटे पडतात
धूळ धूर भरुनी सारी, हवा प्रदुषित करतात ३

अस्वच्छता सगळीकडे, संसर्गाची भीती फार
उलट्या, जुलाब,वरचेवर, श्वसनाचे तेआजार
नाजुक त्यांचा जीव, धोका मोठाबालकांना
निर्मलतेचे संरक्षण, हवे पुरेपूरत्यांना ४

स्वच्छ अन्न, स्वच्छ पाणी, स्वच्छ मन-शरीर
स्वच्छ घर, स्वच्छ हवा, आणि स्वच्छ परिसर
सुधारुनी जीवनमान,आरोग्याचे करूरक्षण
सुध्दृढतेच्या वरदानाने, विकास साधू सर्वांगीण ५

**डॉ. आशा प्रतिनिधि**





# ‘क्षयमुक्त भारता’साठी खासगी वैद्यकीय तज्ज्ञांचे योगदान मोलाचे – आरोग्य मंत्री मा.ना. प्रकाश आबिटकर

सन 2025 अखेर क्षयमुक्त भारत करण्यात खासगी वैद्यकीय तज्ज्ञांचे योगदान मोलाचे राहील, असे मत सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री कोल्हापूर मा. ना. प्रकाश आबिटकर यांनी व्यक्त केले आहे. गारगोटी येथे आयोजित जिल्हा क्षयरोग केंद्र, कोल्हापूर व तालुका आरोग्य कार्यालय, भुदरगड यांच्या मार्फत आयोजित 100 दिवसीय क्षयरोग मोहीम अंतर्गत खासगी वैद्यकीय तज्ज्ञांच्या कार्यशाळेत अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते.

मा.ना. आबिटकर म्हणाले, “आरोग्य विषयक धोरण ठरविण्यासाठी उद्देश व अडचणी समजून घेण्यासाठी खासगी वैद्यकीय तज्ज्ञांशी नियमित संवाद साधणे आवश्यक आहे. क्षयरोग कार्यक्रम हा टार्गेटेड कार्यक्रम आहे. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी व क्षयमुक्त देश, राज्य, जिल्हा क्षयमुक्त करण्यासाठी खासगी वैद्यकीय तज्ज्ञांनी सर्वतोपरी योगदान द्यावे.” बॉम्बे नर्सिंग एक्ट, नवीन वैद्यकीय अधिकारी भरती, महात्मा फुले जन आरोग्य योजना, राज्य रक्त संक्रमण परिषद नियमावली याबाबतही त्यांनी यावेळी माहिती दिली.

या कार्यक्रमास आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालक मंत्री कोल्हापूर मा.ना. प्रकाश आबिटकर, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. सुप्रिया देशमुख, जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. अनिरुद्ध पिंपळे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक, सहायक संचालक (कुष्टरोग) डॉ. हेमलता पालेकर, वैद्यकीय अधीक्षक गारगोटी उपजिल्हा रुग्णालय, डॉ. पल्लवी तारळकर, वैद्यकीय अधीक्षक आजरा ग्रा. रु., डॉ. अमोल पाटील, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. चंद्रकांत परुळेकर, डॉ. मिलिंद कदम, अध्यक्ष आय.एम.ए. भुदरगड, डॉ. राजीव चव्हाण, अध्यक्ष निमा भुदरगड डॉ. सचिन सुतार, डॉ.माधव ठाकूर, श्रीम.काजल देसाई, प्रदीप कुपटे, एकनाथ पाटील यावेळी उपस्थित होते.

या कार्यशाळेस 142 डॉक्टर्स उपस्थित होते. यावेळी जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. हर्षला वेदक यांच्या नियोजनानुसार डयापको-दिशा व स्वयंसेवक यांच्या टीबी-एच.आय.व्ही.एकत्रित टीमने क्षयरोग जनजागृती पथनाटय सादर केले. डॉ. रविंद्र पारकर, डॉ. बिपिन गोंजारी, डॉ. मूकुंद चौगले यांनी 2024 मध्ये उत्कृष्ट नोटीफिकेशन केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. प्रास्ताविक डॉ. चंद्रकांत परुळेकर यांनी केले. सूत्रसंचालन श्री. सचिन चिखले यांनी केले तर आभार डॉ.अमोल पाटील यांनी मानले.

जिल्हा आरोग्य अधिकारी, डॉ. अनिरुद्ध पिंपळे यांनी सर्व खासगी आरोग्य संस्थांनी बॉम्बे नर्सिंग एक्ट नुसार दरपत्रक लावावे, तक्रार पेटी ठेवावी तसेच खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी क्षयरुग्णाचे नोटीफिकेशन करावे, असे आवाहन केले. अध्यक्ष आय.एम.ए. भुदरगड, डॉ. राजीव चव्हाण यांनी सर्व आरोग्य विषयक कार्यक्रमामध्ये खासगी वैद्यकीय व्यावसायिकांचे शासकिय आरोग्य यंत्रणेला कायम सहकार्य राहील, अशी ग्वाही दिली.

या कार्यशाळेत वैद्यकीय अधिकारी डी.टी.सी. डॉ. माधव ठाकूर यांनी नोटीफिकेशन, अत्याधुनिक क्षयरोग निदान व उपचार प्रणाली, साय-टीबी, क्षयरोग प्रतिबंधात्मक उपचार (टी.पी.टी.), पोषण आहार योजना, खासगी वैद्यकीय व्यवसायिंकांना प्रोत्साहनपर भत्ता, निक्षय मित्र, टी.बी. केअर, प्रीझम्टीव्ह नोंदणी, निक्षय प्रणाली, क्षयरोग शासकीय योजना याबाबत विस्तृत माहिती दिली.



वेळ :- १ तास एकूण गुण :- ४०

**प्रश्न क्र. १. योग्य पर्याय निवडा (एकुण गुण - ५)**

अ) खालीलपैकी कोणते रेकॉर्ड आशा ठेवत नाही.
१) आशा डायरी २) ग्रोथचार्ट ३) औषध स्टॉक रजिस्टर ४) कुटुंब पाहणी रजिस्टर

ब) समाजात तुमचे काम उत्तम रितीने करण्यासाठी खालीलपैकी कोणत्या कौशल्याची गरज असते.
१) नेतृत्व २) संपर्क ३) निर्णय क्षमता ४) वरील सर्व कौशल्य

क) गावाचा सर्वांगीण आरोग्यस्तर उंचावण्यासाठी कोणत्या समितीव्दारे नेतृत्व केले जाते.
१) व्हीएचएनएससी २) आरकेएस ३) गावतंटामुक्ती समिती ४) शिक्षण समिती

ड) व्हीएचएनएससी कमिटीत पुढील कोणते सदस्य नसतात.
अ) अंगणवाडी सेविका ब) युवा प्रतिनिधी क) बचतगट महिला प्रतिनिधी ड) तलाठी

इ) गावाच्या सभेत चर्चा होणाऱ्या बाबीची कल्पना कधी दिली पाहिजे.
१) सभेच्या सुरुवातीला किंवा सभेपुर्वी २) सभा संपल्यानंतर क) सभेच्या मध्यंतरामध्ये ड) एक महिन्यानंतर

**प्रश्न क्र. २ योग्य जोडया जुळवा. (एकुण गुण - ५)**

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | उपकेंद्र | (३) | १) ग्राम आरोग्य,पोषण,पाणी पुरवठा व स्वच्छता समिती |
| ब) | व्हिएचएनएससी | (१) | २) पोषण पुर्नवसन केंद्र |
| क) | एनआरसी | (२) | ३) समुदाय आरोग्य अधिकारी |
| ड) | व्हीएचएनसीची सभा | (५) | ४) १०४ टोल फ्रि क्रमांक |
| इ) | एचएसीसी | (४) | ५) दरमहा |

**प्रश्न क्र. ३ चुक बरोबर पर्याय निवडा (एकुण गुण - ५)**

१) व्हीएचएनएससी अंतर्गत खर्च करणेकरीता सर्व सदस्यांची मान्यता घेणे आवश्यक आहे. चुक/बरोबर

२) आशा स्वयंसेविकेने फक्त माता व बालक यांनाच आरोग्य सेवा देणे आवश्यक आहे. चुक/बरोबर

३) स्वच्छतेच्या सवयी आणि पर्यावरण हे धटक चांगले आरोग्य व समाजकल्याण याला मदत करतात. चुक/बरोबर

४) व्हीएचएनएससीची मासिक बैठक घेणे आवश्यक नाही. चुक/बरोबर

## प्रश्न क्र. ४ एका वाक्यात उत्तरे दया (एकुण गुण - ५)

१) जेएएस म्हणजे काय ?

उत्तर - जेएएस म्हणजे जन आरोग्य समिती.

२) पीएमएसएमए म्हणजे काय?

उत्तर - पीएमएसएमए म्हणजे प्रधानमंत्री सुरक्षित मातृत्व अभियान.

३) व्हीएचएनएससीचे कोणकोणते दप्तर आवश्यक आहेत?

उत्तर - समिती सभा नोटीस बुक, इतिवृत्त नोंद वही, जमा खर्च नोंद वही व खर्चाच्या पावत्या इत्यादी.

४) व्हीएचएनएससी समितीचे सदस्य कोणकोण असतात ?

उत्तर - अध्यक्ष-सरपंच आणि सदस्य सचिव - आशा स्वयंसेविका आणि सदस्य - ग्रामपंचायत महिला सदस्य, आंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका / आरोग्य सेवक, लोकाधारीत गटाच्या महिला सदस्य, हातपंप मॅकनीक, मनरेगा समन्वयक, विशेष निमंत्रित सदस्य वैद्यकीय अधिकारी - प्राथमिक आरोग्य केंद्र.

५) १०४ हा टोल फ्री क्रमांक कशासाठी आहे ?

उत्तर - १०४ हा टोल फ्री कमांक आरोग्य सल्ला केंद्राचा आहे.

## प्रश्न क्र. ५ केस स्टडी / उतारा वाचून उत्तरे दया (एकुण गुण - ५)

केस स्टडी - एका गावामध्ये महिलेस तिचा नवरा व सासू मानसिक व शारिरीक त्रास देत आहेत, तिच्यावर अत्याचार करत आहेत

- तुम्ही हा प्रश्न कोणत्या माध्यातून सोडवाल व कसा ?

उत्तर - अत्याचाराबाबतची सर्व माहिती गोळा करणे, प्रप्रश्न विचारणे, महिलेला त्वरीत सुरक्षित ठिकाणी हलविणे, आरोग्य सेवा पोहोचविणे सुकर करणे, भावनात्मक सहाय्य करणे, सुरक्षिततेसाठी उपाय योजना करणे, महिलांना अत्याचार विरोधी कायद्यांबाबत माहिती देणे, अत्याचाराविरुध्द कारवाईमध्ये पोलिस, स्वयंसेवी संस्था, प्रसार माध्यमाचे प्रतिनिधी यांचेंशी समन्वय ठेवणे, महिलांमध्ये एकी व जागरुकता निर्माण करणे, महिलांना सक्षम करणे, गावातील प्रतिष्ठित नागरीक, महिला दक्षता समिती व महिला सुरक्षा समिती यांचेमार्फत अत्याचारापासून महिलेचा बचाव करणे.

## प्रश्न क्र. ६ प्रात्यक्षिक (एकुण गुण - ५)

हात धुण्याची पध्दत आणि फायदे सांगा.

सुरवातीला हात ओले करणे, दोन्ही हातांना कोपरापर्यंत साबण लावून चांगला फेस करणे, त्यानंतर हातांची बोटे, हाताचा पंजा, हाताची नखे व मनगट स्वच्छ करणे व फडक्याला हात न पुसता हवेत हात वाळविणे. हात स्वच्छ धुतल्याने जंतुसंसर्ग होत नाही, अनेक गंभीर आजारापासून बचाव होतो.

**प्रश्न क्र. ७ खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे दया (एकुण गुण -१०)**

१) कुटूंब नियोजनाची साधने कोणकोणती आहेत व त्याची गरज का आहे ?

उत्तर - कॉपर टी, माला एन, इ पील्स, छाया, कॉडम व अंतरा इंजेक्शन इ. कुटूंब नियोजनाची साधने आहे कूंटूब नियोजनाच्या साधनांमुळे लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवता येते. मुलांमध्ये योग्य अंतर ठेवता येते.

२) ॲनिमिया मुक्त भारत कार्यक्रमा अंतर्गत कोणकोणत्या वयोगटातील लाभार्थ्यांना कोणकोणते लोहयुक्त सिरप व गोळया देणे आवश्यक आहे ?

उत्तर - ६ महिने ते ५ वयोगटातील बालकांना लाहेयुक्त सिरप आठवडयातून दोन वेळा देणे, ५ ते ९ वर्षे वयोगटातील  बालकांना दर आठवडयाला १ गुलाबी गोळी, १० ते १९ वयोगटातील किशोरवयीन मुलामुलींना दर आठवडयाला १ निळी गोळी, गरोदर माता व स्तनदा माता यांना पहिल्या तिमाही नंतर रोज १ गोळी व प्रसुतीनंतर पुन्हा रोज १ गोळी  १८० दिवस घेणे तसेच २० ते ४९ वयोगटातील महिला यांनी दर आठवडयाला १ गोळी याप्रमाणे संपुर्ण काळात घेणे.

३) एनसीडी म्हणजे काय, त्या अंतर्गत कोणकोणते आजार आहेत व याकरीता आशा स्वयंसेविकेची भुमिका कोणती आहे ?

उत्तर - एनसीडी म्हणजे नॉन-कम्युनिकेबल डिसीज म्हणजेच असंसर्गिक आजार असा आहे, यामध्ये प्रामुख्याने स्तनाचा कॅन्सर, तोंडाचा कॅन्सर व गर्भाशय मुखाचा कॅन्सर इ. आजारांचा समावेश होतो. याकरीता आशा स्वयंसेविकांनी तिच्या कार्यक्षेत्रातील १८ वर्षावरील सर्व लाभार्थ्यांचे सी-बॅक फॉर्म भरुन समुदाय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून तपासणी करुन घेणे, आजारी लाभार्थ्यांना आरोग्य सेवा घेणेसाठी प्रवृत्त करुन संदर्भसेवा देणे.



# राज्य आरोग्य यंत्रणा संसाधन केंद्र महाराष्ट्र पुणे

## सर्व जिल्हानिहाय आशा स्वयंसेविका गुणानुक्रम तक्ता माहे जानेवारी २०२५

| अ.क्रं | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्राप्त गुण | मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ठाणे | ठाणे | कल्याण | दहागाव | श्रीमती अश्लेषा दिनकर तांबोळी, मो. नं. ८४५९६४६४१० | ३९ | ४९६० |
| २ | | रायगड | पेण | वाशी | श्रीम. मिनल रामचंद्र घरत मु-वडगाव, ता-पेण,रायगड. मोबाईल नं - ९०६७०६७१०८ | ३५ | १६१३१ |
| ३ | | पालघर | मोखाडा | खोडाळा | श्रीमती लिला तोलीराम झुगरे, गाव - कुर्लोद (मानिपाडा), मो. नं. ८७८८८२७९९३ | ३९ | ४९२५ |
| ४ | नाशिक | नाशिक | पेठ | कोहोर | श्रीमती रोहीणी भगवाण खोटरे, रुईपेठा | ४० | १३७५६ |
| ५ | | धुळे | शिंदखेडा | धमाणे | श्रीमती सरला संजय पाटिल, मो. नं. ९६५३२४८७१३ | ३८ | ६५७८ |
| ६ | | नंदुरबार | नंदुरबार | शनिमांडळ | श्रीमती शोभा तुळशीराम चित्ते, मो पो - वैंदाणे मो - ७३५०६७१५९५ | ३७ | १४२५० |
| ७ | | जळगाव | चाळीसगाव | तळेगाव | श्रीमती निर्मला सुनिल सावले, चाळीसगाव, जळगाव | ३२ | ९३०० |
| | | अहमदनगर (अहिल्यानगर) | पारनेर | निघोज | श्रीमती रुपाली नोगश चौधरी, मु.पो. जावळा, तालुका पारनेर, मो. नं. ९१४६८५७५८० | ३९ | १६७३५ |
| ९ | पुणे | पुणे | पुरंदर | वाल्हा | नाव - सविता रमेश दुगाडे.पत्ता - मु.पो.वाल्हा,ता.पुरंदर,जि.पुणे. मोबईल नंबर- ९०२२६९०४७९ | ४० | २५७३५ |
| १० | | सातारा | पाटण | मल्हारपेठ | श्रीमती.सरला अधिकराव नलवडे मु.पो वेताळवाडी ता.पाटण मोबाईल नंबर -९१४५६५९४२२ | ३९ | १६५२५ |
| ११ | | सोलापूर | माळशिरस | मांडवे | श्रीमती नकुशा शेखर झेंडे मु.पो.पिंपरी मो.नं.९१५८९६६०१९ | ४० | १५३२५ |
| १२ | कोल्हापूर | कोल्हापूर | चंदगड | तुडीये | श्रीम. नंदा जोतीबा फर्जंद, मुपो तुर्कवाडी, मो.नं ७७५६०१०३९६ | ४० | १४५६० |
| १३ | | सांगली | पलुस | भिलवडी | श्रीमती वैशाली प्रदिप पाटील, नागठाणे, मो. नं .९३२५३९०९२० | ३८ | १७६४५ |
| १४ | | सिंधुदुर्ग | वेंगुर्ला | तुळस | श्रीम.राजश्री राजन पालकर मु.पो.तुळस पाल ता.वेंगुर्ला मोबा.क्र. ९१५८०६६१९१ | ४० | ६४१० |
| १५ | | रत्नागिरी | चिपळून | रामपूर | श्रीमती स्मिता महेंद्र कदम, मो. नं. ९४२०८९९७०७ | ३९ | १५६६० |
| १६ | औरंगाबाद | छत्रपती संभाजीनगर | छत्रपती संभाजीनगर | वरुडकाजी | श्रीमती ज्योती प्रकाश मुळे मु.पो.शेंद्रा ता.जि. छत्रपती संभाजीनगर. मो.नं. ९८३४४०५४६० | ३६ | ९४५५ |
| १७ | | जालना | अप्राप्त | | | | |
| १८ | | परभणी | जिंतूर | चारठाणा | श्रीमती तपस्या देशमुख(८४११८३७७२१) | ३९ | ५१७० |
| १९ | | हिंगोली | वसमत | हटटा | श्रीमती आम्रपाली मुरलीधर सोनवणे, कउडगांव, मो.नं. ९७३००३५६२९ | ४० | १६९२५ |
| २० | लातुर | लातुर | चाकूर | नळेगाव | श्रीमती पुनम नितीन धांडे रा.नळेगाव ता. चाकूर जिल्हा. लातूर मो. ७८२२८३५५९६ | ४० | ६२०० |
| २१ | | उस्मानाबाद (धाराशिव) | अप्राप्त | | | | |
| २२ | | बीड | माजलगाव | सादोळा | श्रीमती.अलका कोंडीबा गोरे, रा.मजंरथ ता.माजलगाव जि.बीड, मो. नं. ९६२३९४८६८९ | ३९ | १५२२५ |
| | | नांदेड | नायगाव | धुप्पा | श्रीमती रेखा शेषेराव भुसावळे, रा धुप्पा, मो. नं. ७४९८३२०८९४ | ३९ | ७३५२ |
| २४ | अकोला | अकोला | अकोला | आपातापा | श्रीमती वनमाला सुनिल भांडे, मु.पो. म्हातोडी, मो.नं. ९३२२०८०६५९ | ३९ | ७४८५ |
| २५ | | वाशिम | वाशिम | तोडगाव | श्रीमती मायावती अंभुरे, रा. तोडगाव | ३८ | ३७०० |
| २६ | | अमरावती | चिखलदरा | सलोना | श्रीमती मिता गणेष ब्रचले | ३९ | ८८३० |
| २७ | | यवतमाळ | दारव्हा | बोरी | श्रीमती चंदा हरीदास शिंदे .रा.चिंची ता.दारव्हा मो.९६५७४५२५५२ | ३५ | ७११५ |
| २८ | | बुलढाणा | . शेंगांव | जलंब | श्रीमती संगिता रामकृष्ण वाणखेडे, मो. नं. ७३५०१५५०४९ | ३३ | ६४८० |

| अ.क्रं | परिमंडळ | जिल्हा | तालुका | प्राथमिक आरोग्य केंद्र | आशा स्वयंसेविकेचे नांव, पत्ता व दुरध्वनी क्रमांक | प्राप्त गुण | मागील महिन्यात मिळालेला मोबदला (रुपये) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | नागपूर | नागपुर | कळमेश्वर | गोंडखैरी | श्रीमती रक्षा एम मेश्राम, साहुली, ९३७३७६५२४४ | ३९ | ९९३० |
| ३० | | वर्धा | समुद्रपुर | नंदोरी | श्रीमती.सौ.दिपीका पंकज गजभिये रा. समुद्रपर ता.समुद्रपुर जि.वर्धा मो.न ९१४५३८६२०६ | ४० | २०८३० |
| ३१ | | भंडारा | भंडारा | खमारी | सौ. श्यामकला देवानंद कांबडे, मु. पो.करचखेडा,ता.जि.भंडारा, मो. नं. ९९२३७१०२१३ | ४० | १६९२५ |
| ३२ | | गोंदिया | तिरोडा | सुकडी (डा) | श्रीमती सरिता गणेश कटरे | ३७ | ५०१५ |
| ३३ | | चंद्रपूर | चंद्रपूर | धुग्धूस | श्रीमती सिमा मुन्ना गेडाम, धुग्धुस, मो. नं. | ४० | १५१९१ |
| ३४ | | गडचिरोली | धानोरा | मुरुमगांव | श्रीमती शाकरीन मुनिर शेख,रा.मुरुमगांव,पो.मुरुमगांव,ता. धानोरा(९४२१५९८९०५) | ३९ | १०५३५ |

Source B.P.N.I. Maharashtra

# पूरक आहार

1 वाटी = 250 मि.ली.

## पहिले सहा महिने निव्वळ स्तनपान



सहा महिन्यानंतर पूरक आहारासोबत 2 वर्षापर्यंत स्तनपान सुरु ठेवावे.

**जसे बाळाचे वय वाढेल तसा आहार वाढवावा**

### 6 महिन्यांपासून सुरु करावा

**पूरक आहाराचा प्रकार**
कुस्करलेले पदार्थ

**दिवसातून किती वेळा**
दिवसातून 2 ते 3 वेळा व 1 ते 2 वेळा न्याहरी

**किती प्रमाणात द्यावे**
प्रत्येक जेवणावेळी 2 ते 3 चमचे ते अर्धी वाटी

### 7 ते 8 महिन्यात

**पूरक आहाराचा प्रकार**
कुस्करलेले पदार्थ

**दिवसातून किती वेळा**
दिवसातून 2 ते 3 वेळा व 1 ते 2 वेळा न्याहरी

**किती प्रमाणात द्यावे**
प्रत्येक जेवणावेळी 2 ते 3 चमचे ते अर्धी वाटी

### 9 ते 12 महिन्यात

**पूरक आहाराचा प्रकार**
बारीक केलेले कुस्करलेले पदार्थ आणि बाळ स्वतः हाताने घेऊ शकेल असे पदार्थ

**दिवसातून किती वेळा**
दिवसातून 3 ते 4 वेळा व 1 ते 2 वेळा न्याहरी

**किती प्रमाणात द्यावे**
प्रत्येक जेवणात कमीत कमी अर्धी वाटी

### 13 ते 14 महिन्यात

**पूरक आहाराचा प्रकार**
बारीक व कुस्करलेले घरात तयार केलेले पदार्थ

**दिवसातून किती वेळा**
दिवसातून 3 ते 4 वेळा व 1 ते 2 वेळा न्याहरी

**किती प्रमाणात द्यावे**
प्रत्येक जेवणात पाऊण ते एक वाटी

## कविता

# माझे आरोग्य माझी काळजी

माझे आरोग्य माझी काळजी
घेण्याची आहे माझी जवाबदारी,
महाराष्ट्र आरोग्य शासनाने
आणली आहे योजना भारी.
टेलीमानस ह्या योजनेचा
क्रमांक फिरतोय घरोघरी,
टोल फ्री - १४४१६ क्रमांक
हा आहे खूपच भारी.

दिवस रात्र उपलब्ध असतात
आरोग्याचे सल्लागार या नंबरवरी,
केल्यावरी तुम्ही फोन
स्वागत होते दमदार भारी.

नाव, गाव, समस्यांचे ठेवले
जाते गोपनीयतेचे भान,
निसंकोच असे प्रश्न विचारून
मनाला करूया समाधानी.

प्रत्येकाने तणाव मुक्त जीवन
जगण्याचा करायचा निश्चय,
मदतीला आहेत तुमच्या
मानसिक आरोग्याचे सल्लागार...

श्री. राहुल दिलीप वाव्हळे
(मनोविकृती सामाजिक कार्यकर्ता)
जिल्हा रुग्णालय बीड.

## कविता

# सिकलसेल आजार

अनुवांशिक आजार हे नाव याचे सिकलसेल
आई-वडिलाकडून मिळाले रक्त विकृत सेल

लाल वर्तुळाकार असते सर्वांच्या रक्तामधली सेल
त्यांच्या रक्तामध्ये वाहते विळयाच्या आकाराची सेल

होते रक्ताची कमतरता, वेदना होते फार
डॉक्टर म्हणतात यावर नाही कायमचा उपचार

दिसता सर्व सामान्य पण आतुन असतो अपंग
ओळख त्याची अशक्तपणा, बाळांना होतो जंतुसंसर्ग

फॉलीक ॲसीडच्या गोळया, सोबत वेदनाश्यामकाचा हाय डोज
प्यावे भरपुर पाणी, खावे फळे, हिरव्या भाज्या रोज

आहे फक्त उपाययोजना ही पण नाही कायमचा उपचार
मिळु नये पुढच्या पिढीला दोष हा म्हणुन करावा निर्धार

आधी रक्त तपासणी जोडीदाराची मगच करा विवाहाचा विचार

लाल पिवळे कार्ड वाल्यांनी करु नये विवाह आपापसात
निरोगी साथीदार निवडावा जिवनाच्या प्रवासात

शपथ घेवून सारे करु नव्या विचाराची सुरुवात.....
प्रतिबंध एकच हा करेल सिकलसेल वर मात.......

गजेंद्र कांबळे,
जिल्हा समन्वयक,
सिकलसेल आजार नियंत्रण कार्यक्रम.
जिल्हा परिषद, यवतमाळ





## कविता

### स्पर्श अभियानांतर्गत...

# कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र (कुसुम)

कुष्ठरोग होत नाही पाप आणि श्रापाने !तो होतो
मायक्रोबॅक्टेरिया लेप्रि जंतुने !!

कुष्ठरुग्णाच्या स्त्रावांव्दारे इतरांकडे पसरतो!
कमजोर प्रतिकारशक्ती अन् वृध्द लोकांना तो घेरतो !!

गरीबी, संसाधने, स्वच्छता अन् आरोग्य सेवांचा अभाव !
आनुवंशिकतेची संवेदनशीलताही देतो हा घाव !!

कमी संवेदनशीलतेचे पांढरट लालसर चट्टे !
पिळवटलेल्या त्वचेवर पडतात खोल खड्डे !!

प्रभावित भागांवर होते जखमा अन् इन्फेक्शन !
स्नायु अन् हाडांच्या विकारांची होते कनकन !!

आवाजात बदल आणि बोलताना अडचणी !
दृष्टी कमी होऊन पदरी अंधत्वाची ग्लानी !!

समाजातील गैरसमजुतीमुळे येते मानसिकतेवर दडपण!
कलंक बहिष्काराच्या भितीने रुग्णाची होते वणवण !!

मल्टीड्रग उपचार पध्दती मिळत आहे मोफत !
राहु नका तुम्ही अज्ञान अंधारात झोपत !!

त्वचेची घ्या काळजी सौम्य साबन वापरुन !
पळून जाईल संसर्ग स्वच्छतेला घाबरुन !!

रुग्ण असतो गेला आजाराने खचुन !
सहकार्य आणि आधार समाजाचे लाभो भरभरुन !!


प्रोटीन, व्हिटॅमिन मिनरलयुक्त आहार करा सेवन !
शरीराची आरोग्य स्थिती होईल तुमची ए-वन !!


भौतिक उपचार आणि व्यायाम करा तुम्ही न चुकता !
निरोगी अवस्थेचा आनंद निश्चितच तुम्ही उपभोगता !!

रोगाची प्रगती अन उपचार यावर ठेवा लक्ष !
नियमित तपासणीचे शस्त्र वापरुन रहा तुम्ही दक्ष !!

बीट कुष्ठरोग आहे या वर्षीची हाक !
कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र, मारु एकच बांग !!

कवयित्री:
कु. तारा व्दा. शर्मा





# नांदेड जिल्हा आरोग्य अधिकारी पोहचल्या साखर कारखानाच्या पालावर

नांदेड - जिल्ह्यातील ज्या ठिकाणी साखर कारखाने, ऊसतोड कामगार व वीट भट्टी कार्यक्षेत्रा अंतर्गत वंचित गरोदर माता व बालकाचे लसीकरण करणे, राष्ट्रीय कुष्ठरोग व क्षयरोग आरोग्य विषयक समुपदेशन करणे, वैयक्तिक स्वछता, आरोग्य तपासणी ऊस तोडणी कामगार व वीट भट्टी कामगार आहेत यांच्या कुटुंबातील स्थलांतरित कुटुंबाना आरोग्य सेवा उपलब्ध करून त्यांना आरोग्य सेवा देण्यात यावी असे निर्देश नांदेड जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख यांनी दि. 1 फेब्रूवारी रोजी भाऊराव चव्हाण साखर कारखाना देगाव बु ता. अर्धापूर जि. नांदेड येथे पालावर अचानक भेट देऊन निर्देश दिले व त्या ठिकाणी राहत असलेल्या कुटुंबातील गरोदर माता यांची पालावर जाऊन गृहभेट दिली व त्या ठिकाणी राष्ट्रीय माता बालसंगोपन कार्यक्रम अंतर्गत मातेला आरोग्य विभाग मार्फत कोण कोणत्या सेवा दिल्या जातात याची प्रत्यक्ष गरोदर माता लाभार्थी यांच्या सोबत संवाद साधुन आस्थेवाईकपणे विचारणा केली. आरोग्य विभाग मार्फत गरोदर मातांना मोफत आरोग्य सेवा दिली जाते. या सेवेचा लाभार्थींनी लाभ घ्यावा व प्रसृती सुरक्षित शासकीय दवाखान्यात करावी, असे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख यांनी केले.

नांदेड जिल्ह्यात साखर कारखाने व वीटभट्टी तालुक्यातील ज्या प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रा मध्ये साखर कारखाने व वीटभट्टी आहेत. कारखाने सुरु झाले त्या ठिकाणी काम करणारे ऊस तोडणी कामगार यांना शुध्द पाणी पुरवठा होण्यासाठी त्या ठिकाणी असलेल्या पाणी स्रोतांची पाणी नमुने तपासणी करण्यात यावी. राष्ट्रीय माता बालसंगोपन कार्यक्रम मधील संपुर्ण आरोग्य सेवा त्या कारखाना ठिकाणी विशेष आरोग्य शिबीर आयोजित करून आरोग्य सेवा देण्यात यावे. यामध्ये गरोदर मातेला विशेष सेवा या मध्ये संपूर्ण मोफत रक्त तपासणी, लघवी तपासणी, सोनोग्राफी व संदर्भ सेवा देण्यात यावे, असे निर्देश नांदेड जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संगीता देशमुख यांनी अर्धापूर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. श्रीकांत देसाई, वैद्यकीय अधिकारी डॉ. बाळासाहेब पवार यांना निर्देशित केले. यावेळी आरोग्य उपकेंद्र देगाव बु येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# जागतिक कर्करोग दिन साजरा

उपकेंद्र शिरोडी येथे तालुका आरोग्य अधिकारी डॉ. प्रसन्न भाले, वैद्यकीय अधिकारी डॉ. पूर्वा गोंड, डॉ. मयूर जारवाल यांच्या मार्गदर्शनाखाली दि. 4/2/25 रोजी जागतिक कर्करोग दिन साजरा करण्यात आला आणि गावात कर्करोगाबद्दल जनजागृती करण्यात आली.

यावेळी तालुका पर्यवेक्षक प्रकाश ब्रम्हकर, गावातील सरपंच श्री. गोविंद लहाने, समुदाय आरोग्य अधिकारी डॉ. प्रगती पनाड, आरोग्य सेवक श्री. देवीदास बागूल, श्री. गजानन घुगे, श्री. स्वप्नील खिल्लारे, आरोग्य सेविका श्रीमती आरती थारेवाल, सर्व आशा सेविका, जि. प. प्रशाळेचे मुख्यध्यापक श्री. साबळे, शिक्षक श्री. जगताप, श्री. देवरे, श्रीमती पांगरे अणि समस्त गावकरी उपस्थित होते. कर्करोगाची जनजागृती करताना शाळेतील मुलींकडून कर्करोग संबंधित पथनाट्य तसेच कर्करोगाविषयी माहिती देण्यात आली, तंबाकू आणि त्यापासून होणारे दुष्परिणाम याविषयी माहिती देण्यात आली. त्यानंतर एकूण 102 लाभार्थ्यांची कर्करोगाची तपासणी करण्यात आली. त्यापैकी 63 महिला होत्या.



# हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहिमेचे घुंगराळा येथे जिल्हास्तरीय उद्घाटन

नांदेड :- सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रम अंतर्गत " हत्तीरोग दुरीकरण सार्वत्रिक औषधोपचार मोहीम दि. 10 फेब्रुवारी ते 23 फेब्रुवारी 2025 दरम्यान नांदेड जिल्ह्यातील दहा तालुक्यात नायगाव, बिलोली, देगलूर, मुखेड, कंधार, भोकर, हदगांव, हिमायतनगर, किनवट व माहूर या तालुक्यात राबविण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने मोहीमचे आज दि. 10 फेब्रुवारी रोजी नांदेड जिल्हास्तरीय उद्घाटन घुंगराळा ता. नायगाव येथील जिल्हा परिषद शाळा येथे मान्यवरांच्या उपस्थित डी.ई.सी व अलबेडॉझोल गोळ्या सेवन करण्यात आल्या. प्रथम धन्वंतरी प्रतिमेचे पूजन करून दीप प्रज्ज्वलन करण्यात आले. मान्यवराच्या सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमसाठी अध्यक्ष नांदेड जिल्हा परिषदच्या जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ संगीता देशमुख, प्रमुख पाहुणे डॉ. वैशाली तांभाळे, सहायक संचालक, आरोग्य सेवा (हिवताप) लातूर, घुंगराळा सरपंच वसंत पाटील सुगावे, जागतिक आरोग्य संघटना समन्वयक डॉ. शिरीशा पटेल, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष सूर्यवंशी, डॉ शिवशक्ती पवार, सेवा सहकारी सोसायटी चेअरमन श्याम यमलवाड, शालेय समिती अध्यक्ष माधव पाटील ढगे, तंटामुक्ती अध्यक्ष श्याम ढगे, पोलीस पाटील राजेश तुरटवाड, पत्रकार दीपक गजभारे, श्री मोरे, श्री ढगे, मुख्याध्यापक राम अनकोड, ग्रामविकास अधिकारी हणमंत शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आयोजक डॉ राजेश्वर माचेवार जिल्हा हिवताप व हत्तीरोग अधिकारी नांदेड यांनी केले. घुंगराळा येथील खासगी वैद्यकीय व्यवसायिक डॉ उपलंचवार, डॉ कोल्हे यांचा सत्कार करण्यात आला.मा. वसंत सुगावे पाटील यांनी आपल्या भाषणात म्हणाले की,जिल्हास्तरीय कार्यक्रम येथे आयोजित केल्या बदल आरोग्य विभागाचे आभार व्यक्त केले तसेच सर्व गावकरी यांना हत्तीरोगाच्या गोळया सर्वांनी सेवन करावे व हत्तीरोगा पासून मुक्त व्हावे. पुढील काळात आरोग्य विषयक शिबीर आयोजित करण्याकरिता अवगत केले. डॉ संगीता देशमुख जिल्हा आरोग्य अधिकारी नांदेड यांनी आपले मनोगतात म्हणाल्या की, कोणताही आजार होण्या अगोदर त्याचा प्रतिबंध करणे आवश्यक आहे. या गोळया सर्वांनी जेवण करून सेवन कराव्यात. या मध्ये काही दुष्परिणाम नाहीत. तसेच डास निर्मूलनसाठी प्रतिज्ञा घेण्यात आली. शाळेतील विद्यार्थी शुभांगी सूर्यवंशी, नम्रता ढगे, गणेश दंडेवाड, स्वप्नील ढगे यांनी सर्वा समक्ष गोळ्या सेवन केले. कार्यकमाचे सुरेख सूत्रसंचालन जिल्हास्तरीय पर्यवेक्षक व्यकटेश पुलकंठवार यांनी केले व आभार प्रदर्शन सत्यजीत टिप्रेसवार यांनी केले. लातूर येथील आरोग्य निरीक्षक शंकर मोरे, सचिन कुलकर्णी हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी तालुका आरोग्य अधिकारी नायगाव डॉ श्रीकांत पटवेकर, डॉ काशिनाथ सोनवणे, जिल्हा स्तरीय पर्यवेक्षक संजय भोसले, माधव कोल्हे, हत्तीरोग कर्मचारी मनोहर खानसोळे, नागनाथ राऊलवार, बालाजी शिळे, शुभम चाबूकस्वार, कैलास वरपडे, एम डी शिंदे, देविदास पेढारकर, सपनर, नवाज, राऊत, वाहन चालक मुकुंद देवकांबळे, रामू यादव, तालुका आरोग्य अधिकारी कार्यालय नायगाव येथील प्रियदर्शनि खिलारे, संतोष साखरे, कैलास मठपती, शैलेश मच्छरलावार, भास्कर ढेरे, प्रा आ केंद्र कुंटूर येथील सर्व कर्मचारी, उपकेंद्राचे कर्मचारी, आशा स्वयंसेविका, शाळेतील सर्व शिक्षकांनी सहकार्य केले व कार्यक्रम यशस्वी केला.



**- संकलन:- सत्यजीत टिप्रेसवार,**
**आरोग्य निरीक्षक, नांदेड.**

# लेखकांना विनंती

वाचकांचे मनोगत हे सदर लवकरच सुरु करीत आहोत,
तरी लेखांविषयी आपल्या प्रतिक्रिया व अभिप्राय ई-मेल आयडीवर अवश्य कळवावा.
e-mail: ddhsiec.creatives@gmail.com

- महाराष्ट्र आरोग्य पत्रिकेत आरोग्यासंबंधीच्या विषयांवर लेख, कविता,यशकथा इत्यादी साहित्य प्रकाशित केले जाते.
- साहित्य अप्रकाशित असावे. लेख मुख्य संपादक तथा उपसंचालक, आरोग्य सेवा (आय.ई.सी.ब्युरो) राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन इमारत, आरोग्य भवन, विश्रांतवाडी पोलिस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे 411006 या पत्त्यावर पाठवावेत. लेखकांनी स्वतःचा पूर्ण पत्ता दूरध्वनी किंवा भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी लिहावा.
- केवळ पुस्तकी ज्ञानापेक्षा क्षेत्र अनुभवांवरील साहित्याला प्राधान्य देण्यात येते. फक्त मराठी भाषेतील मजकुर प्रसिद्ध होतो.
- लेख/साहित्य प्राप्त झाल्यावर निवड समितीच्या मान्यतेने साहित्याची निवड केली जाते. अस्वीकृत साहित्य परत पाठविणे शक्य होत नाही. आपले लेख कागदाच्या एका बाजूस सुवाच्च अक्षरात लिहून किंवा टंकलिखित करून पाठवावेत. शब्द संख्या 700 ते 800 असावी.
- अपेक्षित महिन्यापूर्वी किमान दोन महिने अगोदर संबंधित लेख या कार्यालयास प्राप्त झाल्यास छपाईचे योग्य काम योग्य वेळेत पूर्ण होऊ शकते. पुढील 3 महिन्यांसाठीचे विषय पुढे दिले आहेत.

## आरोग्य पत्रिकेसाठी पुढील महिन्यांसाठीचे विषय

### मार्च २०२५

| | |
|---|---|
| ८ मार्च | जागतिक महिला दिन व धूम्रपान विरोधी दिन |
| ९ मार्च | जागतिक मूत्रपिंड दिन |
| १० मार्च | गर्भधारणेतील मधुमेह जागरूकता दिवस |
| १२ ते १८ मार्च | जागतिक काचबिंदू सप्ताह |
| १६ मार्च | गोवर लसीकरण दिन |
| मार्च महिन्यातील दुसरा गुरुवार | जागतिक मूत्रपिंड दिन |
| २० मार्च | जागतिक मौखिक आरोग्य दिन |
| २१ मार्च | जागतिक डाऊन सिंड्रोम दिन |
| २२ मार्च | जागतिक जल दिन |
| २३ मार्च | जागतिक हवामान दिन |
| २४ मार्च | जागतिक क्षयरोग दिन |

### एप्रिल २०२५

| | |
|---|---|
| १ ते ७ एप्रिल | अंधत्व प्रतिबंध सप्ताह |
| २ एप्रिल | जागतिक ऑटीझम जनजागृती दिन |
| ७ एप्रिल | जागतिक आरोग्य दिन |
| ११ एप्रिल | जागतिक सुरक्षित मातृत्व दिन |
| १४ एप्रिल | आयुष्यमान भारत–आरोग्यवर्धिनी केंद्र दिन |
| १७ एप्रिल | जागतिक हेमोफिलीया दिन |
| १९ एप्रिल | जागतिक यकृत दिन |
| २२ एप्रिल | पृथ्वी दिन |
| २४ ते ३० एप्रिल | जागतिक लसीकरण सप्ताह |
| २५ एप्रिल | जागतिक हिवताप दिन |

### मे २०२५

| | |
|---|---|
| १ मे | जागतिक कामगार दिन |
| ३ मे | जागतिक दमा दिन |
| ५ मे | जागतिक प्रसविका दिन |
| ८ मे | जागतिक रेडक्रॉस दिन व जागतिक थॅलेसेमिया |
| १० मे | मातृदिन |
| १२ मे | जागतिक परिचारिका दिन व जागतिक दीर्घकालीन थकवा जागरुकता दिवस |
| १४ मे | जागतिक उच्च रक्तदाब दिन |
| १५ मे | जागतिक कुटुंब दिन |
| १६ मे | राष्ट्रीय डेंग्यू दिन |
| १९ मे | जागतिक फॅमिली डॉक्टर दिन |
| २५ मे | जागतिक मल्टीपल स्क्लेरोसिस दिन |
| २८ मे | आंतरराष्ट्रीय महिला आरोग्य दिन व मासिक पाळी स्वच्छता |
| २८ मे ते ८ जून | अतिसार नियंत्रण पंधरवडा |
| ३१ मे | जागतिक तंबाखू विरोधी दिन |

(या अंकातील सर्व मते लेखकांची असून त्यांच्याशी संपादक मंडळ व शासन सहमत असतीलच असे नाही. तसेच लेखातील विषयाबाबत अधिक माहितीसाठी कृपया लेखकांशी संपर्क साधावा)

**पत्र व्यवहारासाठी पत्ता**

मुख्य संपादक, महाराष्ट्र आरोग्य पत्रिका तथा उपसंचालक आरोग्य सेवा, राज्य आरोग्य शिक्षण व संपर्क विभाग, परिवर्तन, आरोग्य भवन परिसर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर, येरवडा,

# राष्ट्रीय असंसर्गजिन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत निदान झालेल्या 61,81,428 रुग्णांवर उपचार

## 41,56,382 रुग्णांना उच्च रक्तदाब, तर 20,09,404 रुग्णांना मधुमेह

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय असंसर्गजिन्यरोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत उच्च रक्तदाब, मधुमेह, मुख कर्करोग, स्तन कर्करोग, गर्भाशय मुख कर्करोगाचे निदान झालेल्या 61,08,549 रुग्णांवर सरकारी आरोग्य केंद्रांमध्ये उपचार सुरु आहेत. बदलती जीवनशैली, मानसिक तणाव, अपुरी झोप याचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून त्यात उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांची संख्या अन्य आजारांच्या तुलनेत अधिक आहे. राज्यातील सर्व 36 जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम राबविला जातो.

राष्ट्रीय असंसर्गजिन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत, तृतीयक केंद्रे, जिल्हा रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय आणि ग्रामीण रुग्णालय, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि शहरी प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र या स्तरावर आरोग्य सुविधा पुरविल्या जातात. असंसर्गजिन्य रोग (नॉन कम्युनिकेबल डिसीज – एनसीडी) हा आजार आहे जो एका व्यक्तीकडून दुसऱ्या व्यक्तीला संक्रमित होत नाहीत. ही व्याख्या विचारात घेतल्यास असंसर्गजिन्य आजारांमध्ये कर्करोग, मधुमेह, उच्च रक्तदाब आदी आजारांचा समावेश होतो. गेल्या आठ महिन्यांच्या कालावधीत राज्यात 41,56,382 रुग्णांना उच्चरक्त दाब, 20,09,404 रुग्णांना मधुमेह, 8,213 रुग्णांना मुखकर्करोग, 3,312 रुग्णांना स्तन कर्करोग आणि 4,117 रुग्णांना गर्भाशय मुख कर्करोगाचे निदान झाले आहे. या रुग्णांवर पाठपुरावा करून उपचार सुरु करण्यात आले आहेत. आरोग्य विभागाने राष्ट्रीय असंसर्गजिन्य रोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत केलेल्या तपासणीतील आकडेवरून हे दिसून आले आहे. या असंसर्गजिन्य आजाराची लक्षणे दिसून आल्यानंतर वैद्यकीय उपचार सुरु करणे हा सर्वांत महत्त्वाचा टप्पा असतो.

जागतिक आरोग्य संघटनेनुसार, हृदयविकार, पक्षाघात, कर्करोग, तीव्र श्वसन रोग आणि मधुमेह यासह जगभरातील सर्व मृत्यूंपैकी 74 टक्क्यांहून अधिक मृत्यू असंसर्गजिन्य आजारांमुळे होतात. या आजारांना जागतिक आणि भारतात सार्वजनिक आरोग्य महत्त्व आहे. एनसीडीमुळे शहरी आणि ग्रामीण लोकसंख्येमध्ये आणि सर्व सामाजिक-आर्थिक स्तरांमध्ये लक्षणीय विकृती आणि मृत्यू होतो. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत असंसर्गजिन्य आजाराविषयी मोठ्या प्रमाणात जागृती केली जाते. प्राथमिक असवस्थेत निदान झाल्यास या आजारांवर नियंत्रण मिळविणे आणि उपचाराने हे आजार बरे होतात.

**कार्यक्रमाच्या अंतर्गत मिळणाऱ्या आरोग्य सेवा-सुविधा:**

- ग्लुकोमीटर कीट्स व रक्तदाब मापन यंत्र वापरून मधूमेह व रक्तदाबाची तपासणी.
- सर्वसामान्यपणे आढळणारे कर्करोग उदा. तोंडाचा कर्करोग, गर्भाशय मुखाचा कर्करोग, स्तनाचा कर्करोग प्राथमिक अवस्थेत असताना कसा ओळखायचा याविषयी जनजागृती.
- संशयित रुग्णांना मोठ्या दवाखान्यात निश्चित निदान व उपचाराकरिता पाठवणे.
- प्रयोगशाळा चाचण्या व तपासण्या, रक्तातील साखर, कोलेस्ट्रॉल, लिपिड प्रोफाईल, रक्तातील युरिया, क्ष-किरण, ई-सी-जी, सोनोग्राफी इत्यादी सोयी उपलब्ध.
- कर्करोग पीडित रुग्णांमध्ये किमोथेरपीचा उपचार सुरु असलेल्या रुग्णांचा पाठपुरावा.
- रुग्णांचे पुर्नवसन व भौतिक उपचार (फिजिओथेरपी) सेवा उपलब्ध.
- कॅन्सर डे केअर सेंटर सुविधा – 13 जिल्ह्यांमध्ये किमोथेरपी युनिट कार्यरत आहेत.

Registered
Maharashtra Arogya Patrika (Marathi)
**RNI No. MAHMAR/2000/1736**
The date of Publication is 24th February 2025




# राज्यस्तरीय कर्करोग तपासणी व जनजागृती मोहीम

Monthly Maharashtra Arogya Patrica is printed and published by Dr. Kailas B. Baviskar on behalf of Public Health Department, Government of Maharashtra
It is Printed at Kalyani Corporation, 1464, Sadashiv Peth, Pune 30. and Published at Maharashtra State Health I.E.C. Bureau, Parivartan', Arogya Bhavan Compound, Opp. Vishrantwadi Police Station, Yerawada, Pune 411 006.